रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३३७ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १४ मे २०२४

किंमत ४₹

## होर्डिंग कोसळून चार ठार, ५९ जखमी

**मुंबई :** घाटकोपरच्या रमाईनगरमध्ये वादळामुळे पेट्रोल पंपावर मोठं लोखंडी होर्डिंग कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत चार जणांचा मृत्यू झाला असून, ५९ जण गंभीर जखमी झाले आहेत. तसेच आतापर्यंत ६७ जणांना बाहेर काढण्यात यश आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, या घटनेत जखमी झालेल्यांच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असून, मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी जाहीर केले.

## सीबीएसई बारावीचा निकाल जाहीर

**मुंबई :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ म्हणजे सीबीएसई बोर्डाचा बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला असून, ८७.९८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदा सीबीएसई बोर्डातील सुमारे १८ लाख विद्यार्थ्यांनी बारावीची परीक्षा दिली होती. यातील ८७.९८ टक्के विद्यार्थी पास झाले आहेत. यंदाही मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ही मुलांपेक्षा जास्त आहे. यंदा मुलांच्या तुलनेत मुलींचा निकाल ६.४० टक्क्यांनी चांगला लागला आहे. यावर्षी ९१.५२ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. तर ८५.१२ टक्के मुलं पास झाली आहेत.



## वे|ध|क

### महावितरण विभागाला पावसाळी आवाहन

**तळा :** तळा तालुक्यात भारनियमनामुळे वीज गायब होण्याचे प्रमाण जास्त आहे. दर मंगळवारी दुरुस्तीची कारणे सांगून संपूर्ण दिवस तालुक्यातील वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. यात विद्युत तारांवर आलेल्या फांद्या तोडणे, जीर्ण झालेले खांब तसेच जुन्या झालेल्या विद्युत तारा बदलणे आदी कामे केली जातात. ग्राहकांकडून वीज बिल वसुली करण्यात नेहमी अग्रेसर असलेल्या महावितरण विभागाला सुरळीत वीज पुरवठा ठेवणे मात्र नेहमी अवघड जाते. पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला असून पावसाळ्यापूर्वी महावितरण विभागाकडून करण्यात येणारी कामे अद्यापही करण्यात आलेली नाहीत. जीर्ण झालेले विद्युत खांब, विद्युत तारांजवळ वाढलेली झाडे, उघड्या डीपी यांसारखी कामे अद्यापही महावितरण विभागाकडून करण्यात आलेली नाहीत. महावितरण विभागाचे कर्मचारी वीजबिल वसुलीच्या कामात एवढे मग्न झाले आहेत की त्यांना ही कामे करण्यासाठी वेळच मिळत नसल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मात्र, यामुळे सध्या सुरू असलेला विजेचा लपंडाव पावसाळ्यातही कायम राहिला नाही म्हणजे झाले, अशी अपेक्षा तळा वासीयांकडून व्यक्त केली जात आहे. एकंदरीत पावसाळी पूर्व कामे पूर्ण करणे महावितरण विभागासाठी एकप्रकारे आवाहन असणार आहे.

# महाड तालुक्यात जलजीवन योजनेचा बोजवारा

## नियमांची पायमल्ली; ठेकेदाराकडून निकृष्ट दर्जाची कामे

**। महाड । प्रतिनिधी ।**

**पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तालुक्यातील गावांमधून विविध योजना राबवल्या गेल्या आहेत. त्यापैकीच यावर्षी जलजीवन योजना राबवण्यात आली. जवळपास १३३ गावांमध्ये या योजनांचा कार्यारंभ झाला असला तरी आजही अनेक गावातील कामे पूर्ण झालेली नाहीत. त्यातच जलजीवन कामांच्या नियमांची पायमल्ली करून निकृष्ट दर्जाची कामे झालेली आहेत. ठेकेदार, अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या संगनमताने ही कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचा आरोप नागरिक करत आहेत.**





महाड आणि पोलादपूर या दोन्ही तालुक्यातील गावे डोंगरदऱ्यामध्ये वसलेली आहेत. एप्रिल महिन्यानंतर अनेक गावातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ येते. पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत मे महिन्याच्या तोंडावर आटत असल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ प्रशासनावर येते. यामुळे गेली अनेक वर्षात करोडो रुपयांच्या योजना पाणी टंचाई दूर करण्यासाठी राबवल्या गेल्या असल्या तरी टँकरमुक्त तालुका झालेला नाही. अशा टंचाईग्रस्त गावांमधून जलजीवन योजना राबवण्याचे शासनाने निश्चित करून जुन्या योजना कार्यान्वित करणे, नवीन योजना राबवणे अशी कामे हातात घेतली आहेत. महाड तालुक्यामध्ये जवळपास १३३ गावांमधून जलजीवनद्वारे कामे मंजूर करण्यात आली आहेत. यापैकी फक्त नऊ गावातच ही कामे पूर्ण झालेली आहेत. ठेकेदार आणि ग्रामस्थांमधील असमन्वय, तर लोकप्रतिनिधी, ठेकेदार आणि अधिकारी यांच्या संगनमतामुळे तालुक्यातील जलजीवन योजनांचा बोजवारा उडाल्याचे स्पष्ट होत आहे.

महाड तालुक्यात या योजनेकरिता करोडो रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. गावातील यापूर्वीच्या योजनांचा विचार न करता सत्ताधारी लोकांच्या मर्जीनुसार या कामांचे वाटप झाले आहे. ज्या गावांमध्ये यापूर्वी देखील लाखो रुपयांच्या योजना कार्यान्वयीत आहेत अशा गावात देखील करोडो रुपयाची जलजीवन योजना मंजूर झाली आहे. याबाबत अनेक गावात तक्रारी देखील झाल्या आहेत. मात्र, या तक्रारींकडे जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून केराची टोपली दाखवली आहे. यामुळे १३३ पैकी विन्हेरे, कोथुर्डे, रावतळी, शिंगर कोंड, राजिवली, किये वाडकर पठार, नडगाव तर्फे तुडील, चांढवे, कडसरी लिंगाणा, या नऊ गावातच हि योजना पूर्ण झाली आहे.

महाड तालुक्यात असलेली पाणी टंचाई दूर करण्यासाठी योग्य नियोजनाची गरज आहे. याकरिता तालुक्यातील प्रलंबित पाणी प्रकल्प पूर्ण झाले तर पाणी टंचाई दूर होईल. महाड तालुक्यातील काळ जलविद्युत प्रकल्पामुळे किल्ले रायगड परिसर, वारंगी ते बिरवाडी, कोंझर ते महाड हा परिसर पाण्याखाली येणार आहेत. विन्हेरे विभागातील आंबिवली धरण, कोथेरी धरण आजही अपूर्णअवस्थेत खितपत पडून आहेत. यामुळे हे प्रकल्प मार्गी लागने काळाची गरज आहे. २०१७ मध्ये १२ गावे १०९ वाड्या, २०१९ मध्ये २५ गावे ११७ वाड्या, २०२० मध्ये १२ गावे ८२ वाड्या, आणि २०२१ मध्ये ३० गावे १३३ वाड्यांवर टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला होता. यावर्षी १३ गावांमधून आणि ११४ वाड्यांमधून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे.

# शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रमाची पायाभरणी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

डॉ. सुभाष शिवराम म्हात्रे अध्यक्ष असलेल्या शिवशांती स्नेहालय व विरंगुळा केंद्र, अलिबाग या संस्थेची वाडगाव येथे नियोजित कामाचा शुभारंभ अक्षय तृतीयेचे औचित्य साधून १० मे रोजी करण्यात आला. याप्रसंगी अलिबागेतील प्रसिद्ध उद्योजक, ब्रह्मा-विष्णू-महेश सिनेप्लेक्सचे संचालक गजेंद्र दळी यांच्या हस्ते वृद्धाश्रमाच्या इमारतीची पायाभरणी करण्यात आली.



वाडगाव येथील डॉ. सुभाष शिवराम म्हात्रे यांनी शिवशांती स्नेहालय वृद्धाश्रमासाठी अठरा एकर जमीन दिली आहे. त्याजमिनीवरील पहिल्या इमारतीची पायाभरणी यावेळी करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. किरण नाबर, योगेश दीनानाथ तरे, डॉ. प्रतिभा म्हात्रे, प्रफुल्ल राऊत, डॉ. जगदीश थळे, डॉ. सुरेश म्हात्रे, डॉ. अनिल डोंगरे, कचरु पाटील, समीर गवळी, ॲड. मनोज पडते, शरद कोरडे या पदाधिकाऱ्यांसह, उमाजी केळुसकर, सरपंच प्रसाद (पिंट्या) गायकवाड, सुधीर गायकवाड, संजना पाटील आदींची उपस्थिती होती. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांकडून उत्स्फूर्तपणे संस्थेस देणग्या देण्यात आल्या. यावेळी डॉ. सुभाष म्हात्रे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. त्यांनी या वृद्धाश्रमासाठी अनेकानेक देणगीदार पुढे येत असून अजूनही मोठ्या प्रमाणात देणगीची आवश्यकता असून त्यासाठी दानशूरांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. लवकरच अद्ययावत वृद्धाश्रम आणि विरंगुळा केंद्र उभे राहील अशीही त्यांनी याप्रसंगी ग्वाही दिली. प्रास्ताविक डॉ. प्रतिभा म्हात्रे यांनी केले. अखेरीस आभार प्रफुल्ल राऊत यांनी मानले.

# महावितरण ‘मिशन ग्रीन एनर्जी’

## विजेची वाढती मागणी; १००० मेगावॉट हरित ऊर्जा खरेदी करणार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

विजेच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर महावितरण मिशन ग्रीन एनर्जी अंतर्गत तब्बल १ हजार मेगावॉट वीज सौरऊर्जा प्रकल्पातून खरेदी करणार आहे. त्यासाठी कंपनीने खुल्या निविदा मागवल्या असून पुढील दोन वर्षांत सौर प्रकल्प उभारून वीजपुरवठा करणे बंधनकारक आहे.

### प्रतियुनिट विजेचा दर तीन रुपयांच्या घरात

**महावितरण दीर्घकालीन खरेदी कराराच्या माध्यमातून वीज घेणार आहे. त्यामुळे विजेची किंमत ई-रिव्हर्स बिडिंगद्वारे निश्चित केली जाणार आहे. दरम्यान, या नियोजित वीज प्रकल्पात तयार होणाऱ्या प्रतियुनिट विजेचा दर २.९० रुपये ते ३.४० रुपयांपेक्षा जास्त असू नये, अशी अट घालण्यात आली आहे. त्यामुळे परवडणाऱ्या दरात महावितरणला आणि पर्यायाने ग्राहकांना उपलब्ध होऊ शकणार आहे.**

महावितरणचे सध्या जवळपास ३५ हजार मेगावॉटहून अधिक क्षमतेचे वीज खरेदी करार आहेत; मात्र त्यामध्ये औष्णिक वीज प्रकल्पांचे प्रमाण जास्त आहे. मात्र, अनेकदा कोळसाटंचाईमुळे पुरेशी वीज उपलब्ध होण्यात अडचणी निर्माण होतात. त्यातच अपारंपरिक ऊर्जा वापराचे उद्दिष्ट पूर्ण करणे बंधनकारक आहे. त्यामुळे खुल्या बाजारातून महागडी वीज खरेदी करण्यापेक्षा वीज खरेदी कराराच्या माध्यमातून पुढील २० वर्षांसाठी सौर ऊर्जा प्रकल्पातून वीज उपलब्ध व्हावी, म्हणून खुली निविदा मागविण्यात आली आहे. यामध्ये पात्र वीज कंपनीला देशात कुठेही वीज प्रकल्प उभारता येणार आहे.

# ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभा




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे तिसावे पुष्प संपन्न झाले. पनवेल येथील गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात पिंपरी चिंचवड येथील स्वरा किंबहुने या बालगायिकेने आपली गायन सेवा सादर केली. विदुषी अपूर्वा गोखले यांची शिष्या असलेल्या व अवघे नऊ वर्षे वय असलेल्या स्वरा हिने आपल्या मधुर गायकीने रसिक पनवेलकरांना मंत्रमुग्ध केले. संगीत सभेचा प्रारंभ राग ‘अब तो बड़ी बेर’ या बड़ा ख्यालाने केला. नंतर तिने ‘ना मैं खेलुंगी होरी कान्हा संग’ ही ठुमरी सादर केली. त्यानंतर तिने हंसध्वनी रागात ‘जानी जानी री जग की ये रीत’ हा तराणा सादर केला. यानंतर गणेश स्तवन, कौसल्येचा राम, बाई मी विकत घेतला शाम, बाजे रे मुरलिया बाजे, रूनुझुणू रूणुझुणु रे भ्रमरा, घेता नाम विठोबाचे, ऋतुराज आज वनी आला, मी पुन्हा वनांतरी, नारायणा रमारमणा, ही भक्तीगीते व नाट्यपदे गाउन रसिकांची प्रशंसा प्राप्त केली.

# सुजाता टेंबे यांचे निधन

**। खांब । प्रतिनिधी ।**



रोहा तालुक्यातील देवकान्हे येथील सामाजिक कार्यकर्ते गोविंद उर्फ नाना टेंबे यांच्या पत्नी सुजाता टेंबे यांचे शनिवारी (दि.११) वयाच्या ६५व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल पंचक्रोशीसह तालुक्यातून प्रचंड हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुलगे, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी सोमवारी (दि.२०) तर अंतिम धार्मिकविधी विधी गुरूवारी (दि.२३) त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

# आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमाचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा असा दिलेला संदेश आपल्या समाजातील मुला मुलींनी शैक्षणिक प्रगती करून आपल्या आई-वडिलांचे व गावाचे नाव उंच करावे, असे मार्गदर्शन पंचशील बौद्ध मंडळ खंडाळे अलिबाग यांनी आयोजित केलेल्या आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात डॉ. जयपाल पाटील यांनी सांगितले.



याप्रसंगी व्यासपीठावर मंगेश मोरे, वैष्णवी कदम, डॉ. जयपाल पाटील उपस्थित होते. यावेळी डॉ. जयपाल पाटील यांनी रायगड जिल्ह्यात शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे मोफत चालविले जाणारे अलिबाग, पनवेल, पाली व महाड येथील मुलींचे वसतिगृह व मुलांसाठी अलिबाग, तळा, महाड येथील व जावळी माणगाव येथील दहावी पर्यंतचे माध्यमिक विद्यामंदिर याचा आपल्या समाजातील गोरगरीब, गरजवंतांनी शिक्षणासाठी लाभ घ्यावा, असे सांगितले.

यावेळी कधी केव्हाही अपघात प्रसंगी १०८ रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा, आपली मुलगी बाळंतपणासाठी बाहेर आल्यावर तिला जिल्हा रुग्णालयात नेण्यासाठी १०२ रुग्णवाहिकेचा वापर कसा करावा, पावसाळा आता जवळ आल्याने काही वेळा वीजा कोसळतात त्यासाठी केंद्र सरकारने ‘दामिनी’ ॲप काढला असून विजे बाबत सुरक्षेची माहिती मोबाईलवर कशी मिळते, महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलिसांचा ११२ क्रमांकाचा वापर कसा करावा. या माहिती सोबतच महिलांनी आपल्या घरातील गॅसची काळजी कशी घ्यावी, हे सांगितले.

# निशी ठक्कर रायगडात प्रथम

**। अलिबाग । वार्ताहर ।**

दहावी आयसीएसई बोर्डच्या परिक्षेत निशी भरत ठक्कर ही ९८.६०% मिळवून रायगडमध्ये पहिल्या क्रमांकांने उत्तीर्ण झाली आहे. तसेच, निशी ही गणित, जीवशास्त्र, इतिहास आणि नागरीकशास्त्र या विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवून संपुर्ण भारतात प्रथम क्रमांकाचे स्थान मिळविले आहे. निशी ठक्कर ही प्रो आयआयटी ॲकॅडमी पेण येथे दहावी आयसीएई बोर्डाची तयारी करत होती.




# संत गाडगेबाबा समाजभूषण पुरस्कार

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगावचे नगराध्यक्ष ज्ञानदेव मारुती पवार यांना रविवारी (दि.१२) आविष्कार फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य या सेवाभावी संस्थेतर्फे कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांच्या हस्ते राज्यस्तरीय विशेष संत गाडगेबाबा समाजभूषण पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.



आविष्कार फाऊंडेशन ही संस्था सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, आरोग्य, सांस्कृतिक क्षेत्रात गेली १८ वर्षे कार्यरत आहे. या फाऊंडेशनतर्फे समाजात वेगवेळ्या क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जिल्हा व राज्य स्तरावर पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येतो. या सोहळ्यात माणगाव नगरीचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांचा सामाजिक क्षेत्रातील योगदान विचारात घेऊन त्यांचा संस्थेतर्फे राज्यस्तरीय विशेष संत गाडगेबाबा समाजभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, राज्य पुरस्कार निवड समिती सदस्य माधुरी सावंत, फाऊंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किशोर मोहिते आदी मान्यवरांसह राज्यभरातून पुरस्कारती व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# रेल्वे स्थानकातील सिंह पर्यटकांचे आकर्षण

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान रेल्वे स्थानकात पर्यटकांचे आकर्षण ठरावे यासाठी लोखंडी तारांनी साकारलेला सिंह उभारलेला आहे. त्या सिंहाच्या प्रतिकृतीला रंगवण्यात आले असून पर्यटकांसाठी त्या सिंहासोबत फोटो काढणे हे देखील आकर्षणाचे केंद्र ठरत आहे. मध्य रेल्वेच्या महत्वाच्या रेल्वे स्थानकात अशा काही प्रतिकृती मध्य रेल्वे प्रशासनाकडून बनविण्यात आल्या आहेत.



मिनीट्रेन इंजिनमुळे पर्यटकांचे माथेरान स्थानकातील आकर्षण वाढले असून आता पर्यटकांच्या आकर्षणाचा आणखी एक भाग स्थानकात उभारण्यात आलेले सिंह ठरत आहे. लोखंडी तारांपासून सिंहाची प्रतिकृती साकारण्यात आली असून साधारण साडेचार फूट लांब आणि साडेतीन फूट उंच अशी सिंहाची प्रतिकृती पर्यटकांचे आकर्षण ठरत आहे. त्या सिंहाच्या प्रतिकृतीला मोरचूद (कॉपर) रंगाने रंगवण्यात आले असून त्यामुळे त्या सिंहाचा डोलदार पणा आणखी उठून दिसत आहे.

# महेश निमणे पुरस्काराने सन्मानित

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खोपोली येथिल महेश निमणे यांच्या सुखी वास्तु स्पिरिच्यूअल सर्व्हिसेस या अध्यात्मिक संस्थेला टायकून ऑफ महाराष्ट्र पुरस्काराने मराठी सिनेतारका ऋता दुर्गुळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. गेल्या दिड महिन्यांपासून टायकून ऑफ एशिया ही नवीन उद्योग प्रोत्साहित करणारी नामवंत संस्था महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून पुरस्कार प्रदान करीत असताना रायगड जिल्ह्यातून खोपोली शहरात तसेच संपुर्ण महाराष्ट्रभर कमी खर्चात वास्तुदोष निवारण पद्धती, अंकशास्त्र कुंडली



यांच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षात नैसर्गिक पद्धतीने उपाययोजना देणारी संस्था म्हणून सुप्रसिद्ध असल्यामुळे तीची दखल या संस्थेनी घेतली. महेश निमणे वास्तुदोष निवारणच्या व्यतिरिक्त व्यवसाय कसे कारावे यासाठी त्यांनी ‘व्यवसाय विक्री १०१ उपाय’ हे पुस्तक लिहून नविन व्यवसायिकांच्या हातात देउन त्यांच्यामध्ये चैतन्य निर्माण करण्याचे काम केले. त्याचबरोबर विविध उपक्रम राबविण्यांचे काम करीत आहे. रक्तदान शिबीर, भजन, तबला वादक असे अनेक नवनविन उपक्रम हाती घेत आहे. एक व्यवसायिक ते आध्यामिक काम करीत असल्यामुळे या संस्थेने दखल घेवून पुरस्कार दिल्याबद्दल महेश निमणे यांचे सर्वत्र ठिकाणी कौतुक होत आहे.

# ऋतुगंध सुगंधालयाचे उद्घाटन

**सुकेळी :** येथिल ऋतुजा तेलंगे यांनी नुकतेच ऋतुगंध सुगंधालय या नावाने एक नविन व्यवसाय सुरू केला आहे. त्या दुकानाचे उद्घाटन शांताराम तेलंगे व वैशाली तेलंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या नव्याने सुरू करण्यात आलेल्या दुकानामध्ये सर्व प्रकारच्या ब्रॅण्डेड कंपनीच्या मन प्रसन्न करणाऱ्या व दैवी अनुभूती देणाऱ्या सुगंधीत अगरबत्ती, कापुर, धुप, धुपास्टीक, भीमसेनी कापुर, कापुरदानी, सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य, विविध प्रकारचे सेंट, परफ्यूम्स, अशा अनेक वस्तू होलसेल व रिटेल भावात मिळणार असल्याचे ऋतुजा तेलंगे यांनी सांगितले.

# खराब वातावरणामुळे जांभळाचे पीक लांबणीवर

## ■ करवंदांच्या पिकालाही फटका; आदिवासी हताश

**। रसायनी । वार्ताहर ।**

**रसायनी परिसरात यंदाच्या वर्षी खराब हवामानाचा फटका जांभूळ, करवंद पिकाला बसला आहे. तसेच, जांभळाच्या झाडांना मोहोर उशिरा आणि कमी आला असल्याने बाजारात जांभळे उशीर येतील, अशी शक्यता आहे. त्यामुळे उन्हाळ्यात जांभूळ, करवंदे विकून काही पैसे कमावणारे आदिवासी बांधव हताश झाले आहेत.**



कच्च्या करवंदांना लोणच्यासाठी चांगली मागणी असते. रसायनीलगतच्या माणिक गडाच्या डोंगर रांगातील आदिवासी बांधवांना खास असे उपजीविकाचे साधन नसल्यामुळे ते पावसाळ्यात भात आणि भाजीपाल्याचे पीक घेतात; तर पावसाळ्यानंतर रसायनी, पाताळगंगा परिसरात सिंचनाचा आधार असलेले शेतकरी जमिनीत उन्हाळी मळे लावतात. तसेच, आदिवासी वाड्यांमधील अनेक आदिवासी बांधव उन्हाळ्यात करवंदे, जांभूळ, आंबे विकतात. मागील वर्षी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात बाजारात जांभूळ दाखल झाले होते. सध्या काही झाडांना अजून काहीच दिसत नाही, तसेच काहींना कमी-जास्त प्रमाणात छोटी-मोठी जांभळे आली असल्याचे दिसत आहे. दहा-पंधरा दिवसांनी झाडांना आलेली जांभळे पिकण्यास सुरुवात होईल, अशी शक्यता आदिवासी बांधवांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, सध्याचे खराब हवामान, अवकाळी पाऊस झाल्यास फळांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

> **डोंगरांना वणवे लावले जात असल्याने करवंदांची झाडे जळतात. परिणामी झाडांची संख्या घटू लागली आहे. करवंदाचे पीक कच्चे तोडून आदिवासी बांधव मोहोपाडा, पनवेल, चौक बाजारात विक्रीसाठी घेऊन जातात. यंदा जांभळाचे पीक कमी दिसत आहे.**
> **– सुदाम कडपे, कृषिमित्र**

# सृष्टी खोत हिचे यश

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंड्यातील आदित्य मेडिकल स्टोअर्सचे संदिप खोत यांची स्नुषा सृष्टी आदित्य खोत हिने अमेरिकेतील युनिव्ह युर्निव्हसिटीमधून इन्फरमेशन सिस्टममध्ये मास्तर्स पदवी प्राप्त केली. तिच्या यशाचे कौतूक सर्व स्तरातून केले जात आहे.



सृष्टी आदित्य खोत हिने लग्नानंतर उच्चशिक्षणासाठीची सदिच्छा सासरे संदिप खोत यांचेकडे व्यक्त केली. तिच्या सदिच्छेनुसार संदिप खोत यांनी तिला पुढील उच्च शिक्षणासाठी अमेरिकेतील बिगहॅमटोन, स्टेट युर्निव्हसिटी ऑफ न्युर्याक या विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी पाठविले. तिथे तिने सुयश प्राप्त करून इन्फरमेशन सिस्टममध्ये मास्तर्स पदवी प्राप्त केली. तिच्या कॉलेजचे डिन श्रीहरी व प्रेसिंडन्ट हार्वी यांचे हस्ते पदवी दिक्षांत सोहळा १० मे रोजी ब्रिगहॅम टोन-न्युर्याक येथे संपन्न झाला.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३३७ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## वादळी वाऱ्यासह गारपीट

**नेरळ :** कर्जत तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. अवकाळी पावसामुळे कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात घरांचे नुकसान आणि झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे.तालुक्यातील बहुसंख्य रस्त्यांवर वाहतूकदेखील मंदगतीने सुरू होती. या अवकाळी पावसासोबत जिते परिसरात गारांचा पाऊस झाला. मात्र, या काळात मोठ्या प्रमाणावर वादळी वाऱ्यासह पाऊस सुरू होता आणि त्यात असंख्य झाडे उन्मळून तसेच पान ५ वर


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. १४ मे २०२४

किंमत ४ ₹


## खुन्याला २४ तासांत जेरबंद

**पाताळगंगा :** भानुदास भिवा चौधरी हे कलोते फाटा येथे वडापाव चहा विक्रीचा व्यवसाय करीत होते. मात्र, त्याच ठिकाणी नितेश पाटील यांचा व्यवसाय असल्यामुळे त्यांच्यामध्ये व्यावसायिक चुरस निर्माण होत. यामुळे आपल्या व्यवसायाला वडापावचे दुकान अडथळा निर्माण होत असल्यामुळे चौधरी यांचा गळा दाबून हत्या करण्यात आली. तसेच त्यांचा मृतदेह या हॉटेलच्या पाठीमागे महेश भंडारी यांच्या शेतामध्ये असलेल्या उंबराच्या झाडाखाली टाकण्यात आला. मात्र, पोलिसांनी गोपनीय माहिती घेऊन आरोपीस २४ तासांच्या आत पान ५ वर

● (छायाचित्र : समीर मालोदे)





# अवकाळीचा फेरा, मतदानाचे तीनतेरा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात सोमवारी (दि. १३) मतदानाच्या दिवशी मावळ लोकसभा मतदारसंघात दुपारपर्यंत कडक उन्हाळा, तर दुपारनंतर अवकाळी पडलेल्या धुवाँधार पावसाने मतदानाचे अक्षरशः तीनतेरा वाजले. आतापर्यंत झालेल्या तीन टप्प्यांतील मतदानाची आकडेवारी पाहता मतटक्का वाढवण्यात प्रशासनास सर्व सोपस्कार करुनही अपयश आले आहे. त्यामुळे पुरती दमछाक उडालेल्या प्रशासनाची अवकाळीने अधिकच तारांबळ उडवली. अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्याने मतदानासाठी आलेल्या मतदारांना ताटकळत राहावे लागले. दरम्यान, देशातील १० राज्यांतील ९६ मतदारसंघात मतदान पार पडले असून, ६२.६४ टक्के मतदानाची नोंद, तर राज्यातील ११ मतदारसंघांत ५२.६३ टक्के मतदान झाले. दिग्गजांचे भवितव्य पणाला लागले असून, त्यांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले.

### देशात ६२.६४, राज्यात ५२.५३ टक्के

देशातील १० राज्यामधील ९६ मतदारसंघांपैकी महाराष्ट्रातील ११ मतदारसंघात ५२.६३%, ओडिशा (४)- ६३.८५%, तेलंगणा (१७)- ६१.१६%, उत्तर प्रदेश (१३)- ५७.३५%, पश्चिम बंगाल (८)- ७५.७२%, आंध्र प्रदेश (२५)- ६८.१२%, बिहार (५)- ५५.६२%, जम्मू आणि काश्मीर (१)- ३५.९७%, झारखंड (४)- ६३.३५%, मध्य प्रदेश (८)- ६८.३०% मतदान झाले असून, सर्वाधिक पश्चिम बंगालमध्ये झाले.



मावळ 52.30%
पुणे 44.90%
शिरुर 43.89%
बीड 50.37%
जळगाव 51.98%
जालना 59.44 %
नंदुरबार 60.60%
रावेर 56.16%
शिर्डी 55.27%
अहमदनगर 53.27%
औरंगाबाद 54.02%

### लक्षवेधी लढती

मावळ : संजोग वाघेरे पाटील (उबाठा)-श्रीरंग बारणे (शिवसेना), नंदुरबार : ॲड. गोवाल के पाडवी (काँग्रेस)-हिना विजयकुमार गावित (भाजप), जळगाव : करण पवार (उबाठा)- स्मिता वाघ (भाजप), रावेर : श्रीराम पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट)-रक्षा निखिल खडसे (भाजप), जालना : कल्याण काळे (काँग्रेस)-रावसाहेब दादाराव दानवे (भाजप), औरंगाबाद : चंद्रकांत खैरे (उबाठा)- संदीपानराव भुमरे (शिवसेना), पुणे : रवींद्र हेमराज धंगेकर (काँग्रेस)- मुरलीधर किसन मोहोळ (भाजप), पान ५ वर





## अवकाळीने उडवली तारांबळ

**खोपोली :** खालापूर तालुक्यात दुपारी ३ वाजून ४५ मिनिटाच्या सुमारास मुसळधार अवकाळी पावसाने गारपिटांसह दमदार सुरुवात केल्याने अनेकांची तारांबळ उडाली. वीटभट्टी व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे मतदानासाठी घराबाहेर पडणाऱ्या नागरिकांची चांगलीच फजिती झाली. अनेकांनी दुपारच्या कडाक्याच्या उन्हानंतर मतदान करण्याचा बेत आखला होता, परंतु, अवकाळीने त्यांची निराशा केली. त्यामुळे मतदानाच्या टक्केवारीवरही परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले. पावसाचा जोर इतका भयानक होता की, अनेकांना घराबाहेर पडणेही मुश्किल झाले होते.

## ग्रामस्थांचा मतदानावर बहिष्कार

**उरण :** दि. ६ मे २०२३ रोजी उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील आगरी कोंढरीपाडा येथे हनुमान मंदिरात मूर्तीची विटंबना झाली होती. ती विटंबना करणाऱ्या समाजकंटकावर उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. परंतु राजकीय हस्तक्षेपामुळे आरोपीवर कोणतेही कायदेशीर कारवाई झाली नाही. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी आजच्या मतदानावरच जाहीर बहिष्कार घातला. याबाबत सर्व ग्रामस्थ हनुमान मंदिरात एकत्र आले होते. सर्व ग्रामस्थांचे १७०० मतदान असून, त्यांनी लोकसभेप्रमाणेच विधानसभेच्या निवडणुकीवरही बहिष्कार टाकण्याचा निर्धार केला आहे.

## वाघेरे यांचा विजय निश्चित : आ. जयंत पाटील

देशात सुरू असलेल्या हुकूमशाही विरोधात ही लढाई आहे. संविधानाबरोबरच लोकशाही वाचविण्यासाठी इंडिया आघाडीच्या माध्यमातून देशातील २८ पक्ष एकत्र आले आहेत. मावळ मतदारसंघातील मतदार जागरुक आहेत. संजोग वाघेरे यांना भरघोस मते मिळतील, असा विश्वास आहे. राज्यात ३५ जागा इंडिया आघाडी जिंकणार आहे, त्या पद्धतीने वातावरण आहे. त्यामुळे इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांचा विजय हा निश्चित आहे.

## चिन्ह दाखवण्यावरून मतदान केंद्रात गोंधळ

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

मतदान केंद्रात बसून आपल्या उमेदवाराच्या चिन्हाचा प्रचार करत असल्याचे लक्षात आल्यानंतर दुसऱ्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी याला आक्षेप घेतल्याने कामोठेमधील मतदान केंद्रात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. कामोठे वसाहतीमधील सुषमा पाटील विद्यालयात असलेल्या मतदान केंद्रात हा प्रकार घडला असून, सर्वत्र शांततेत मतदान पार पडत असताना घडलेल्या या घटनेमुळे मतदान प्रक्रियेला गालबोट लागले आहे. भाजपाच्या काही महिला पदाधिकारी महायुतीचे उमेदवार श्रीरंग अप्पा बारणे यांचे निवडणूक चिन्ह असलेल्या धनुष्यबाण या चिन्हाचा प्रचार करत असल्याचे लक्षात आल्यानंतर विरोधी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी याला आक्षेप घेतल्यावर हा गोधळ झाल्याचा आरोप विरोधी पक्षातील पदाधिकाऱ्यांनी केला असून, तशा प्रकारची व्हिडीओ क्लि[illegible] समाज माध्यमानवर प्रसारित करण्यात आली आहे.

## नेरळ आनंदवाडी केंद्रामध्ये सर्व कर्मचारी दिव्यांग



। नेरळ । प्रतिनिधी ।

मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात हरित मतदान केंद्र, महिला कर्मचारी असलेले गुलाबी मतदान केंद्र आणि दिव्यांग कर्मचारी असलेले मतदान केंद्र बनविण्यात आली होती. त्यात कर्जत तालुक्यातील नेरळ येथील आनंद वाडी केंद्र हे दिव्यांग कर्मचारी केंद्र होते. दरम्यान, या केंद्रावर विधानसभा मतदारसंघातील सर्वाधिक दिव्यांग मतदार असल्याने असा प्रयोग या मतदान केंद्रावर करण्यात आला होता.

कर्जत विधानसभा मतदारसंघात दिव्यांग मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वाधिक दिव्यांग मतदार आनंद वाडी केंद्रामध्ये असल्याने येथे दिव्यांग पान ५ वर

## बारणेंना हुतात्म्यांचा विसर

। चिरनेर । प्रतिनिधी ।

खासदार श्रीरंग बारणे हे दहा वर्षे खासदार म्हणून सत्तेत आहेत. मात्र, खासदार असताना, चिरनेर गावाच्या विकासासाठी निधी आणायचा सोडाच; पण ज्यांनी स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांविरुद्ध लढा दिला, त्या चिरनेर जंगल सत्याग्रहातील स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांना त्यांच्या २५ सप्टेंबर या स्मृतिदिनी अभिवादन करण्यासाठी ते एकदाही चिरनेर गावात फिरकले नसल्याचा संताप उपसरपंच सचिन घबाडी, शेकापचे उरण पूर्व विभाग माजी चिटणीस सुरेश पाटील, माजी उपसभापती शुभांगी पाटील, तसेच अन्य कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. चिरनेर गावाला दरवर्षी पुराचा तडाखा बसतो. या गावाला बसणाऱ्या महापुराच्या तडाख्यात चिरनेर ग्रामवासियांच्या घरात पाणी शिरून, अन्नधान्य तसेच मौल्यवान चीज वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. एका वर्षी तर या गावातील एका दाम्पत्याच्या राहत्या घरात पाणी शिरून पती-पत्नी मृत्युमुखी पडल्याची घटनाही या गावात घडल्याचे सचिन घबाडी यांनी सांगितले. अशा वेळीदेखील खा. श्रीरंग बारणे पूरग्रस्तांच्या सांत्वनासाठी कधीच आले नाहीत, याबाबत घबाडी यांनी संताप व्यक्त केला.

## मोबाईलच्या उजेडात मतदान

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

अचानक आलेल्या अवकाळी पावसात वीज गेल्याने ग्रामीण भागातील मतदान केंद्रावर कर्मचाऱ्यांची एकच तारांबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. प्रभाग क्रमांक एकमधील धानसर गावात चक्क मोबाईलच्या उजेडात मतदान प्रक्रिया पार पाडण्यात आली. लोकसभा निवडणुकीच्या पार्शवभूमीवर प्रशासनाकडून जय्यद तयारी करण्यात आल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, ग्रामीण भागात मोडणाऱ्या मतदान केंद्रावर वीज गेल्यावर कोणत्याही प्रकारची यंत्रणा उपलब्ध नसल्याने प्रशासनाच्या दाव्याची पोलखोल झाली आहे.

मतदारांच्या चांगल्या प्रतिसादात सुरु असलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान दुपारच्या सुमारास अचानक पावसाने हजेरी लावली. यावेळी झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे लहान-मोठे वृक्ष कोसळण्याची शक्यता लक्षात घेत महावितरणकडून वीजपुरवठा खंडित करण्यात आला. परिणामी, ग्रामीण भागात असणाऱ्या मतदान केंद्रात अंधार पडून मतदान प्रक्रिया काही काळ विस्कळीत झाली होती. काही काळानंतर ग्रामस्थांनी आणलेल्या चार्जिंगच्या बॅटऱ्या आणि मोबाईल टॉर्चच्या उजेडात मतदान प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असली तरी घडलेल्या या घटनेमुळे प्रसासनाच्या दाव्यातील फोलपणा उघड झाला आहे.

## अल्पावधीत पर्यायी जागा



**नेरळ :** कर्जत तालुक्यात गारपीटसदृश्य पाऊस पडला आणि त्या पावसाने कर्जत येथे पोलीस मैदानात उभारलेले कापडी मंडप यांची धूळधाण उडाली. त्यामुळे मतदान यंत्र संकलित करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या मंडपात पाणीच पाणी झाले आणि शेवटी पर्याय शोधण्यात आला. दरम्यान, निवडणूक यंत्रणेने बाजी लावताना पोलिसांच्या मदतीने मतदान यंत्र संकलित करण्यासाठी अंतिम क्षणी नवीन जागा तयार करून घेतली आणि यशस्वी व्यवस्था तयार करून घेतली.

आज मतदान पार पडल्यावर सायंकाळी सात वाजल्यापासून सीलबंद मतदान यंत्र पोलीस मैदान येथील मंडपात येणार होते. मात्र, कर्जत तालुक्यात दुपारी सुरू झालेल्या पावसाने कर्जत येथील निवडणूक यंत्रणेची सर्व गणिते बदलून टाकली. मंडपात पावसामुळे चिखल तयार झाला. ही स्थिती पान ५ वर

## मावळचा सुभेदार कोण?



। प्रमोद जाधव ।

**अलिबाग :** मावळ लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघात सोमवारी मतदान शांततेत पार पडले. सकाळी सात वाजल्यापासून ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुमारे ५२.३० टक्के मतदान झाले. मागील निवडणुकीत ५९ टक्के मतदान झाले होते. त्यामुळे मतदानाच्या टक्केवारीत यंदादेखील घसरण झाल्याचे दिसून आले आहे. इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे, महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्यासह ३३ उमेदवारांचे भवितव्य ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले. मतमोजणी चार जूनला पुणे येथील बालेवाडीमधील श्री शिव छत्रपती क्रीडा संकुलातील वेट लिफ्टींग हॉलमध्ये होणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. गेल्या महिन्याभरापासून मतदारसंघात प्रचार करण्यात आला. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांच्यासह अनेक दिग्गजांच्या सभा झाल्या. शनिवारी पान ५ वर






विधानसभा-१९० मतदार संघात सरासरी ५५.०५ टक्के एवढे मतदान झाले. खरी लढत विद्यमान खासदार श्रीरंग बारणे आणि संजोग वाघेरे पाटील यांच्यातच झाली. दरम्यान, सायंकाळच्या सुमारास संपूर्ण तालुक्यात वादळी वाऱ्यासह पावसाच्या तुरळक सरी बरसल्या. त्यामुळे सायंकाळी मतदानासाठी जाणाऱ्या नागरिकांनी घरातून बाहेर न पडणे पसंत केले. शेवटच्या अर्ध्या तासात मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाल्याचे दिसून आले.




कर्जत विधानसभा मतदारसंघातील ३३९ मतदान केंद्रांवर उत्स्फूर्त मतदान झाले. दुपारनंतर काही काळ अवकाळीने हजेरी लावल्याने मतदारांचा खोळंबा झाला. सायंकाळी सहापर्यंत सुमारे ५६ टक्के मतदान झाले.




पनवेल विधानसभा मतदारसंघातील ५४४ मतदान केंद्रांवर सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली. सकाळी नऊनंतर मतदानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सायंकाळी सहा वाजेपर्यंत ५२.३० टक्के मतदान झाले.




मावळ विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रात सकाळपासूनच मतदारांचा उत्साह दिसून आला. ज्येष्ठांबरोबरच तरुण मतदारांनीदेखील मतदानासाठी रांग लावली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत ५०.१२ टक्के मतदान झाले. परंतु, सायंकाळी पाऊस पडू लागल्याने मतदारांचा ओघ कमी झाला. त्यामुळे सायंकाळी सहा वाजेपर्यंत अंदाजे ५८ टक्के मतदान झाल्याचे सांगण्यात आले.




चिंचवड विधानसभा मतदारसंघात सुरुवातीला मतदानाला प्रतिसाद कमी होता. मात्र, सकाळी नऊनंतर मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाली. सायंकाळी सहा वाजेपर्यंत अंदाजे ५१ टक्के मतदान झाल्याचे सांगण्यात आले.




पिंपरी विधानसभा मतदारसंघातील मतदारांनी या मतदानाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. मतदानाची आकडेवारी पाहता सायंकाळी सहा वाजेपर्यंत सुमारे ५० टक्के मतदान झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## मतदार यंत्रांमध्ये बदल

सकाळी मतदानापूर्वी झालेल्या मॉकपोलवेळी २५ बॅलेट युनिट, ६ कंट्रोल युनिट आणि १४ व्हीव्हीपॅट यंत्र बदलण्यात आले. यामध्ये पनवेल (१ बीयु, ३ व्हीव्हीपॅट), कर्जत (३ बीयु, २ व्हीव्हीपॅट), उरण (६ बीयु, २ व्हीव्हीपॅट), मावळ (३ बीयु, १ सीयु, ४ व्हीव्हीपॅट), चिंचवड (९ बीयु, ३ सीयु, २ व्हीव्हीपॅट), पिंपरी पान ५ वर

# केजरीवालांची सुटका

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची जामिनावर सुटका ही केंद्रातील भाजप सरकारला एक जोरदार चपराक आहे. केजरीवाल यांना सोडले जाऊ नये यासाठी केंद्रातर्फे सरकारी वकिलांनी आटोकाट प्रयत्न केले. सर्वोच्च न्यायालयानेही एका झटक्यात निर्णय दिला नाही. दोन-तीन वेळा निकाल राखून ठेवला व नंतरच तो दिला. ज्या दारू धोरण घोटाळ्यात केजरीवाल यांना अटक करण्यात आली त्याची चौकशी दोन वर्षांपूर्वी सुरू झाली होती. या काळात मनीष सिसोदिया, संजय सिंग या आपच्या अन्य नेत्यांना अटक झाली. पण केजरीवाल यांचे नाव आरोपपत्रात नव्हते. नंतर त्यांना चौकशीसाठी समन्स काढण्यात आली. पण त्यातही केजरीवाल यांच्यावरचे आरोप काय आहेत व चौकशी कशाची आहे याचा खुलासा होत नव्हता. त्यामुळे केजरीवाल यांनी पोलिसांसमोर हजर होण्याचे टाळले. त्यानंतर लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर २१ मार्च रोजी त्यांना अटक झाली. हे सरळ सरळ आम आदमी पक्षाचा प्रचार लंगडा करण्याचे कारस्थान होते. केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने सलग दोन वेळा दिल्लीच्या निवडणुका तीनचतुर्थांश बहुमताने जिंकल्या. विशेषतः २०१४ आणि २०१९ च्या लोकसभेतील मोदी लाटेनंतर वर्षभरात झालेल्या या निवडणुकांमध्ये भाजपचा पार सफाया झाला. त्यानंतर दिल्ली महानगरपालिकेतूनही भाजपला आपने हद्दपार केले. पुढे पंजाबची सत्ताही काबीज केली. दिल्लीत त्यांनी गरिबांना स्वस्त वीज, मोफत पाणी आणि चांगले शिक्षण या योजना उत्तम रीतीने राबवून दाखवल्या. त्यामुळेच आजही केजरीवाल यांची दिल्लीत जबरदस्त क्रेझ आहे. भाजपने दिल्लीच्या नायब राज्यपालांमार्फत केजरीवाल यांना कैचीत पकडण्याचा सतत प्रयत्न केला. पण त्यांनी नेहमीच भाजपवर बाजू उलटवली. या सगळ्यावर काय तोड काढावी हे भाजपला आजतागायत उमगलेले नाही. मध्यंतरी न्यायालयाने संजय सिंग यांची सुटका करण्याचे दिलेले आदेश हाही भाजपला झटका होता. आता केजरीवालही बाहेर येणे हा दुसरा दणका आहे.

## सवाई मोदी

काँग्रेस हाच एकमेव शत्रू आहे असे मानून लढणे भाजप आणि मोदींच्या सोईचे असते. काँग्रेस साठ वर्षे सत्तेत असल्याने देशात जे काही वाईट घडते आहे त्याची जबाबदारी काँग्रेस आणि नेहरुंवर ढकलता येते. त्यामुळेच यंदाच्या निवडणुकीत मोदी गेल्या दहा वर्षांत आपण काय केले हे सांगण्याऐवजी काँग्रेसच्या असल्या-नसल्या चुकांचा उद्धार करीत आहेत. काँग्रेस दलितांचे आरक्षण काढून घेऊन मुस्लिमांना देणार आहे किंवा मंगळसूत्र काढून घेणार आहे असला तद्दन खोटा प्रचार करीत आहेत. गेल्या सत्तर वर्षात देशात असा खोटारडा पंतप्रधान झाला नाही. काँग्रेस व राहुल गांधी आपल्या परीने याचा प्रतिवाद करीत आहेत. मात्र कितीही म्हटले तरी काँग्रेसकडे भूतकाळाच्या चष्म्यातून पाहणारे असंख्य लोक या देशात आहेत हे नाकारता येत नाही. आम आदमी पक्षावर असले कोणतेही भूतकाळाचे ओझे नाही. त्यामुळे तो भाजपला जशास तसे उत्तर देऊ शकतो. देशातील इतर सर्व पक्षांवर ते हिंदुत्वविरोधी असल्याची टीका करता येऊ शकते. आपवर ती करता येणार नाही असा बंदोबस्त केजरीवाल यांनी करून ठेवला आहे. अयोध्येत राममंदिराचे उद्घाटन झाले तेव्हा आपनेही तो प्रसंग जोरात साजरा केला. रामभक्तांना अयोध्येला जाण्याची सोय केली. दिल्ली दंगलींच्या काळात त्यांनी मुस्लिम आंदोलकांची बाजू घेणेही टाळले. काश्मिरातील ३७० कलम हटवण्याचे त्यांनी तात्काळ स्वागत केले होते. आतादेखील केजरीवाल यांनी तुरुंगातून सुटल्यावर हनुमानाच्या मंदिरात जाण्याचा इव्हेंट घडवून आणला. थोडक्यात, केजरीवाल हे विरोधकांमधले सवाई मोदी आहेत. त्यांचे वक्तृत्व उत्तम आहे. ते भाजपला त्यांच्याच भाषेत उत्तर देऊ शकतात. त्याची सुरुवातही त्यांनी केली आहेच. मोदी हे येत्या सप्टेंबरात ७५ वर्षांचे होत असून त्यांना त्यांच्याच नियमानुसार रिटायर व्हावे लागेल याची आठवण त्यांनी करून दिली आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर मोदी नव्हे तर अमित शाह पंतप्रधान होऊ शकतात असे म्हणून केजरीवाल यांनी भाजपच्या गोटात एक पिल्लू सोडून दिले.

## बाजू उलटली

एरवी विरोधकांमध्ये गडबड गोंधळ उडवून देणे हा खास भाजपचा प्रांत आहे. मोदींनी एखादे विधान करावे आणि त्याचा खुलासे काँग्रेसने करीत बसावे असा प्रकार गेल्या काळात सातत्याने घडला आहे. केजरीवाल यांनी ही बाजू उलटवली. तिचा असरही झटक्यात झाला. अमित शाह यांनी लगोलग याचा खुलासा केला व मोदींना ७५ चा नियम लागू नाही असे सांगून टाकले. त्यामुळे अर्थातच नव्या वादंगांना तोंड फुटले. अडवानी, मुरली मनोहर यांना एक न्याय आणि मोदींना दुसरा, हे का, असे सवाल होऊ लागले. रविवारी त्यांनी केजरीवाल की गॅरंटी म्हणून दहा मुद्दे मांडले. वीज, पाणी, शिक्षण इत्यादींबाबत दिल्लीचा कित्ता इतरत्र गिरवण्याचा मनसुबा जाहीर केला. आता १७ मे रोजी मुंबईत मोदी सभा घेणार असतानाच इंडिया आघाडीच्या सभेला केजरीवालही येणार आहेत. खुद्द दिल्लीमध्ये काँग्रेससोबत आपची आघाडी आहे. त्यामुळे तेथील सातही जागांवर विजय मिळवण्याच्या शक्यता वाढल्या आहेत. शेजारच्या हरियाणा तसेच पंजाबमध्येही आपच्या उमेदवारांना मोठे बळ मिळणार आहे. दारु घोटाळ्यात केजरीवाल यांच्यावर स्पष्ट आरोप नाहीत. एका साक्षीदाराने केजरीवाल यांची भेट घेतल्याचा जो जबाब दिला त्याच्या आधारे हा सर्व दावा उभा करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने हाच प्रश्न सरकारला वारंवार विचारला. ऐन निवडणुकीच्या तोंडावर केजरीवाल यांना अडकवून ठेवण्यामागे काळेबेरे आहे असा स्पष्ट संशय नोंदवला. निवडणुका पाच वर्षात एकदाच येतात, केजरीवाल हे मुख्यमंत्री आहेत त्यांना गजाआड ठेवण्याचा अट्टाहास का आहे असेच न्यायालयाचे म्हणणे होते. याचा जनतेत जायचा तो संदेश जाणार आहे. मोदी सरकार आपल्या विरोधकांची मुस्कटदाबी करण्याचा कसा प्रयत्न करते हे सर्व जगासमोर आले आहे. मोदीविरोधी आघाडीला त्यामुळे चांगले बळ मिळणार आहे. मोदींचा प्रचार ढेपाळलेला आहेच. त्यावर आणखी जबर प्रहार होणार आहेत.

विचार

# पराक्रमाचे दुसरे नाव...

**छत्रपती संभाजी हे इतिहासातील फार मोठे नाव आहे. त्यांचे अवघे जीवनचरित्र अनेक थरारक घटनांनी भरले आहे. प्रेमाबरोबरच पराकोटीचा मत्सर, द्वेष झेलणाऱ्या या राजाने अखेरच्या श्वासापर्यंत आपले स्वत्व जपले. प्राणाचे मोल देत अस्मिता जपली. स्वराज्याचे रक्षण करण्याचे मोठे काम त्यांनी केले. म्हणूनच हा राजा आजही इथल्या जनतेच्या मनावर अधिराज्य गाजवत आहे. त्यांचेच हे पुण्यस्मरण.**



पुढे जात राहणे हा प्रवाहाचाच नव्हे तर समाजाचाही गुणधर्म असतो. काळ नेहमी पुढेच जातो. विकासाचे नवनवीन टप्पे पार करतो. 'जुने जाऊ द्या मरणालागुनी' या केवळ काव्यपंक्तीच नव्हे, तर एक सार्वत्रिक विचारधाराही आहे. मात्र 'जुने तेच सोने' असे मानणाराही एक वर्ग याच समाजात नांदतो. काही व्यक्तिमत्त्व, व्यक्तिचित्र, व्यक्तिरेखा कालातीत असतात. वेगळ्या अर्थाने त्या अमर असतात. त्यांचे जीवनचरित्र कधीच काळाच्या चौकटीत सामावू वा अडकू शकत नाही. म्हणूनच पुढे जातानाही मान वळवून मागे पाहण्याचा मोह आवरता आवरत नाही, कारण मागे पडलेल्या प्रत्येक वळणावर कोणी ना कोणी भेटणार याची खात्री असते. छत्रपती संभाजी महाराज हे असेच एक नाव. दर वर्षी त्यांची जयंती उत्साहात साजरी होते. या निमित्ताने त्यांचे स्मरण होते. त्यांच्या शौर्याला, विरश्रीला प्रणिपात केला जातो. मानाचा मुजरा करत राजांना अभिवादन केले जाते. सध्याच्या समाजावर राजकारणाचा वर्ख अधिक गडद होत असताना तर काही वर्ग या दिवसाला वेगळ्या औचित्यानिशी साजरा करताना दिसतो. मात्र कारणे वेगवेगळी असली तरी स्वराज्य आणि धर्मरक्षणाचे पालन करताना जीवाची बाजी लावणाऱ्या या इतिहासपुरुषाचे स्मरण होणे महत्त्वाचे.

आज छत्रपती संभाजी महाराजांचा आठव अनेक कारणांनी गरजेचा आहे. कारण अस्मिता जपणे म्हणजे काय, राज्यकर्त्याने कर्तव्याचे नेमकेपणाने आणि सर्व शक्तीनिशी पालन करणे म्हणजे काय, वैयक्तिक स्नेहापासून धर्मरक्षणापर्यंतची जबाबदारी स्विकारताना आणि सांभाळताना एखाद्याला नेमक्या किती संकटांमधून जावे लागते, आप्तस्नेह्यांचा रोष किती पराकोटीचा असू शकतो अशा वा यासारख्या अनेक गोष्टींचा उलगडा त्यांच्या संपूर्ण जीवितकार्यातून होतो. निश्चितच त्यामुळे जगण्याच्या विविध आयामांचाही परिचय होतो. शौर्य, धीरोदात्तपणा, क्षात्रतेज, निर्भिडता, प्रखर बुद्धिमत्ता अशा एक ना अनेक गुणांचा समुच्चय असणारे हे व्यक्तिमत्त्व राजकारण, समाजकारणाबरोबरच जगण्याचे आणि नातेसंबंधातील गुंतागुंतीचे अनेक पापुद्रे उलगडून दाखवते. म्हणूनच त्यांचे स्मरण आपल्याला विचार करण्यास भाग पाडते. १४ मे १६५७ रोजी पुरंदरवर संभाजीराजांचा जन्म झाला. दुर्दैवाने त्यांना अधिक काळ मातृसुख लाभले नाही. लहान असतानाच मातोश्री सईबाई बाळांतक्षयाच्या आजाराने निवर्तल्यामुळे धाराऊ या दुधाआईने त्यांची मायेने काळजी घेतली. आजी राजमाता जिजाऊ यांनी संभाजीराजांच्या संगोपनात जातीने लक्ष पुरवले. शिवाजीराजांनी आपल्या या राजपुत्राला

**भागा वरखडे**

घडवण्यासाठी चोख व्यवस्था लावून दिली होतीच. त्यामुळेच ते शस्त्रविद्या, विविध भाषा, न्यायशास्त्र, अर्थशास्त्र, गणित आदींमध्ये तरबेज होते. विद्वान पंडितांकडून त्यांना मार्गदर्शन आणि शिक्षण मिळाले. अवघे साडेसात वर्षांचे वय असतानाच औरंगजेबाचे सेनापती मिर्झाराजे जयसिंह आणि दिलेरखानाच्या रुपाने स्वराज्यावर मोठे संकट आले होते. त्यामुळे होणारे स्वराज्याचे नुकसान टाळण्यासाठी शिवाजीराजांनी त्यांच्याशी संघर्ष केला, पण त्यांच्या प्रचंड सामर्थ्यापुढे राजांना क्षणिक माघार घ्यावी लागली. पुरंदरचा तह करावा लागला. या तहानुसारच लहानग्या संभाजीराजांना मुघलांची मनसबदारी स्विकारावी लागली आणि शिवरायांना औरंगजेबाच्या पन्नासाव्या वाढदिवसासाठी आग्रा इथे जाणे भाग पडले. सहाजिकच मुघलांचा मनसबदार म्हणून सात वर्षांचे संभाजीमहाराज पित्यासह आग्र्याकडे निघाले. तिथेच हे दोघे औरंगजेबाच्या कैदेत अडकले. मात्र राजांनी शिताफीने सुटका करुन घेतली तरी संभाजीराजांना त्या लहान वयात आग्र्यापासून स्वराज्यापर्यंतचा जीवघेणा प्रवास करावा लागला. घरापासून शेकडो योजने दूर एका कुटुंबामध्ये काही काळ घालवावा लागला. हा त्यांच्या जीवनातील अत्यंत परीक्षेचा काळ होता. मात्र त्याच विद्वान पंडितांच्या घरात वास्तव्याला असताना संभाजीराजांना संस्कृत भाषेचे उत्तम ज्ञान प्राप्त झाले. त्यांना ब्रिजभाषाही शिकता आली. संभाजीराजांच्या जडणघडणीतला हा एक महत्वाचा टप्पा म्हणावा लागेल. अवघ्या नवव्या वर्षी त्यांनी दाखवलेली समज या टप्प्यामध्ये स्पष्ट दिसते. पुढे युवराज संभाजी म्हणून संभाजीराजांचे आयुष्य सुरू झाले. शिवाजी महाराजांनी त्यांना राज्यकारभाराचे धडे देण्याची व्यवस्था केली आणि त्यासाठीच कोकणात पाठवले. इथे त्यांच्या आयुष्यातील दोन प्रसंगांची नोंद घ्यायलाच हवी. एक म्हणजे एकदा इंग्रज वकील राजगडावर आला होता. त्यावेळी शिवाजीराजे उपस्थित नसल्याने संभाजीराजांनी त्यांचे स्वागत केले. पुढे या वकिलाने लिहून ठेवले आहे की, संभाजीराजांकडून रायगडाची सगळी गोपनीय माहिती मिळवण्याचा माझा प्रयत्न होता. त्याच हेतूने मी युवराजांना विविध प्रश्न विचारले आणि रायगडाची सुरक्षा व्यवस्था वा मराठी राज्याविषयीची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला, पण या चाणाक्ष युवराजाने कोणतीही माहिती दिली नाहीच. उलटपक्षी, माझ्याकडूनच इंग्रज आणि इंग्लंडशी संबंधित अनेक प्रश्न विचारुन माहिती घेतली. एका इंग्रज वकिलाने लिहून ठेवलेल्या या तपशीलावरुनही संभाजीराजांच्या चाणाक्षपणाचे दर्शन घडते. पुढे संभाजीमहाराज आणि त्यांच्या सावत्र मातोश्री सोयराबाई यांच्यात काही काळ संघर्ष झाला तर त्याच काळात काही कारभाऱ्यांशीही त्यांचा झगडा झाला. काळ पुढे सरकताना तो संघर्ष आणखी तीव्र होत गेला. या संघर्षाच्या परिणामस्वरुप संभाजीराजांना दिलेरखानाकडे जावे लागले. हा राजकारणाचा एक भाग असल्याचे काही अभ्यासकांचे मत आहे. शिवाजीराजांच्या पश्चात संभाजी महाराजांवर स्वराज्यजतनाची फार मोठी जबाबदारी आली. ती त्यांनी अत्यंत यशस्वीरित्या पेलली. हा देखील त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा टप्पा होता. संभाजीराजांनी एकाच वेळी स्वराज्याच्या अनेक शत्रूंशी यशस्वी मुकाबला केला. त्यांचा सर्वात मोठा संघर्ष औरंगजेबाच्या प्रचंड मोठ्या साम्राज्याशी होता. शिवाजी महाराजांच्या निधनाची बातमी ऐकल्यानंतर औरंगजेबाच्या मतात हिंदवी स्वराज्य जिंकण्याची महत्त्वाकांक्षा उफाळून आली. त्याच भूमिकेतून तो सर्व सामर्थ्यानिशी हिंदवी स्वराज्यावर चालून आला. हे करत असताना त्याने स्वराज्याच्या सर्व शत्रूंना राजांविरुद्ध भडकवले आणि उठाव करण्यास भाग पाडले. पण अशा अत्यंत बिकट समयीदेखील संभाजीराजांनी पराक्रम, चातुर्य, मुत्सद्देगिरी आणि कर्तृत्वाचे दर्शन घडवत हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले. तब्बल नऊ वर्षे त्यांनी निकराचा संघर्ष केला. औरंगजेबाच्या चिथावणीवरुनच इंग्रजांनी मराठी राज्यांमध्ये काही कागाळ्या केल्या. परिणामस्वरुप इंग्रजांनीही स्वराज्यावर आक्रमण केले पण राजांनी त्यांनाही धडा शिकवला आणि मैत्रीचा हात पुढे करण्यास भाग पाडले. यामागेही संभाजीमहाराजांची दूरदृष्टी दिसून येते. पोर्तुगीज, जंजिरेकर सिद्धी आणि मुगलांसारख्या ताकदवान शत्रूंशी संघर्ष करत असताना आपल्याला इंग्रजांसारख्या पाश्चात्य शत्रूकडून मदत मिळेल हे त्यांनी जाणले होते. त्या काळी आपण दारुगोळा, तोफा, बंदुका आणि धातू यासाठी पाश्चात्य युरोपियन सत्तांवर अवलंबून होतो. ही रसद सतत मिळत रहावी यासाठी संभाजी महाराजांनी शरण आलेल्या इंग्रजांशी तह केला आणि त्याचा परिणाम म्हणून इंग्रजांकडून राजांना सर्व प्रकारची रसद मिळण्याचा मार्ग खुला झाला. यातूनही संभाजीराजांचे चातुर्य दिसून येते. औरंगजेबाच्या चिथावणीवरुन जंजिरेकर सिद्धीने कोकणातील मराठी मुलखात शिरुन जाळपोळ, लुटालुट, अत्याचार सुरू केले होते. हे बघून त्याला धडा शिकवण्यासाठी संभाजीराजे त्या मोहिमेवर गेले आणि राजपुरीपर्यंत धडक मारली. राजपुरी जिंकल्यानंतर जंजिऱ्याचा किल्ला जिंकण्यासाठी आवश्यक त्या क्षमतेचे आरमार नसल्यामुळे संभाजीमहाराजांनी जमिनीवरचा सेतू बांधण्याचा प्रयत्न केला. ही आगळीवेगळी कल्पना होती. मात्र त्याच वेळी मुघलांची स्वारी कल्याण-भिवंडीपर्यंत आल्यामुळे त्यांना ही मोहीम नाईलाजाने अर्धवट सोडून तिकडे जावे लागले. पण या स्वारीमुळे जंजिरेकर सिद्धीला मोठा धडा मिळाला आणि पुढे संभाजीराजांच्या हयातीपर्यंत तो पुन्हा स्वराज्याच्या वाट्याला गेला नाही. औरंगजेबालाही संभाजीराजांकडून हिंदवी स्वराज्य जिंकून घेता आले नाही. अखेरच्या काळात औरंगजेबाने राजांना प्रचंड त्रास दिला. एकूण ४२ दिवस महाराजांनी शत्रूविरुद्ध केलेला तो आगळावेगळा संघर्ष म्हणावा लागेल. अटक केल्यानंतर अभय देण्याच्या बदल्यात औरंगजेबाने चार मागण्या केल्या होत्या. मुघल फौजेतील फितूर झालेल्यांची नावे सांगणे, मराठी राज्याचा खजिना कोठे आहे ते सांगणे, छत्रपती म्हणून स्वराज्यातील सर्व किल्लेदारांना आपले किल्ले मुघलांच्या ताब्यात देण्याविषयी पत्र पाठवणे आणि इस्लाम धर्माचा स्विकार करणे या त्या चार मागण्या होत्या. मात्र महाराजांनी त्या फेटाळल्या आणि जीवाची बाजी लावत प्रतिकार केला. अशा या थोर राजाला मानाचा मुजरा.

आजकाल

# सावधान ! निवडणूक आयोगाकडे लक्ष असू द्या

क्रोनॉलॉजी समझिए:

१. दि. १९ एप्रिल आणि २६ एप्रिल २०२४ रोजी मतदानाचे पहिले दोन टप्पे पूर्ण झाले. या मतांची टक्केवारी निवडणूक आयोगाने ३० एप्रिल रोजी जाहीर केली. पहिल्या टप्प्यानंतर ११ दिवसांनी आणि दुस-या टप्प्यानंतर ४ दिवसांनी ही आकडेवारी जाहीर झाली. त्यातून तीन प्रमुख प्रश्न निर्माण झाले:

अ) ही आकडेवारी जाहीर करायला एवढा वेळ का लागला ?

ब) ही आकडेवारी मतदानाच्या दिवशी जाहीर केलेल्या टक्केवारीहून तब्बल ५ ते ५.५ टक्के अधिक आहे. हे कसे काय ?

क) ही आकडेवारी टक्क्यांमध्ये दिली आहे मात्र प्रत्यक्ष मतदानाचे आकडे का दिलेले नाहीत ? म्हणजे

**श्रीरंजन आवटे**

समजा एखाद्या मतदारसंघात एकूण २ लाख मतदार आहेत. त्यापैकी १ लाख लोकांनी मतदान केले. म्हणजे ५० टक्के मतदान झाले, असे आपण म्हणतो. निवडणूक आयोगाने केवळ ५० टक्के इतकाच आकडा जाहीर केला मात्र प्रत्यक्ष मतदान आणि एकूण मतदारांची संख्या ही माहिती जाहीर केली नाही.

२. या संदर्भात पूनम अग्रवाल या पत्रकार महिलेने आवाज उठवला. २०१९ सालच्या निवडणुकांच्या आकडेवारीमधील तफावतही त्यांनी दाखवून दिली. त्यानंतर २०१९ चा डाटा वेबसाईटवर काढून टाकण्यात आला, असे अग्रवाल यांनी म्हटले आहे.

३. आयोगाने याविषयी काहीही स्पष्टीकरण दिले नाही. त्यानंतर आठवडाभराने ६ मे २०२४ रोजी या अनुषंगाने कॉन्ग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी इंडिया आघाडीतील मित्रपक्षांना पत्र लिहिले आणि निवडणूक आयोगाच्या आकडेवारी बाबत प्रश्न उपस्थित केले. पुढील टप्प्यातील नोंदणीकृत मतदारांची यादीही आयोगाने प्रकाशित केली नाही आणि या अनुषंगाने सर्व मित्रपक्षांनी आवाज उठवला पाहिजे, असे आवाहन केले. ४. या मित्रपक्षांना लिहिलेल्या पत्राला चक्क निवडणूक आयोगाने उत्तर दिले. यात खरगेंना धमकीवजा भाषेत आयोगाने लिहिले आहे. आयोगाची बदनामी करत आहात. संभ्रम निर्माण करत आहात. यातून मतदारांच्या मनात संशय निर्माण होईल. इथून पुढे तरी आपण अशी वक्तव्ये टाळाल (अन्यथा कारवाई होईल) अशा आशयाचे हे पत्र आहे. याशिवाय आमच्या वोटर टर्नआउट वर मतदानाची टक्केवारी आहेच. डाटा दिलेला आहेच. कोणताही उशीर नाही. असे आयोगाचे म्हणणे आहे. तसेच १७ सी हा फॉर्म सर्व पक्षांच्या एजंटसकडे असून आकडेवारीमध्ये कोणताही फेरफार होऊ शकत नाही, अशी पुस्ती आयोगाने जोडली आहे. ५. या पत्राला खरगेंनी उत्तर दिले आहे. या पत्रात खरगे म्हणतातः अ) मित्रपक्षांना लिहिलेल्या पत्राला चक्क आयोगाने उत्तर दिले ! भाजपच्या नेत्यांच्या द्वेषमूलक वक्तव्याबाबतच्या तक्रारी आयोगाकडे करुनही त्याला उत्तर नाही आणि या पत्राला मात्र उत्तर ! आश्चर्य आहे. या पत्रातही आयोगाने सत्ताधारी पक्षावर आचारसंहितेचे उल्लंघन केल्याबाबत कारवाई न करण्याचे कारण दिलेले नाही. ब) आयोगाच्या भाषेविषयी मला आक्षेप आहे; पण आता मी त्यावर भर देत नाही. आयोगावरचे दडपण मी समजू शकतो. क) मतदारसंघनिहाय एकत्रित प्रत्यक्ष मतदानाची आकडेवारी देण्यास आयोग कायदेशीरदृष्ट्या बांधील नाही, असे आयोगाने म्हटले आहे, हे आश्चर्यकारक आहे. खरगेंच्या पत्रातला हा सर्वांत महत्वाचा मुद्दा आहे. ६. आता विरोधी पक्षाच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाऊन आपल्या मागण्या मांडल्या आहेत. ७. असोसिएशन ऑफ डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स () यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका केली असून यात मागणी केलेली आहे की प्रत्येक टप्प्याच्या मतदानानंतर आयोगाने ४८ तासांच्या आत सर्व डाटा जाहीर करावा. वेबसाइटवर हा डाटा अपलोड करावा. ८. प्रेस क्लब ऑफ इंडिया, द इंडीयन वुमेन प्रेस कार्पोरेशन, द प्रेस असोसिएशन अँड् फॉरीन प्रेसिडेंटस क्लब यांनी निवडणूक आयोगाला पत्र लिहून हीच मागणी केलेली आहे. ९. नागरी समाजातल्या अनेक संस्थांनी निवडणूक आयोग पक्षपाती भूमिका बजावतो आहे, असा आरोप केला आहे. प्रधानमंत्र्यांसह अनेक भाजप नेत्यांच्या द्वेषपूर्ण वक्तव्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही केलेली आहे. १०. एकूणात ही सगळी अवस्था लक्षात घेता, इंडिया आघाडीच्या घटक पक्षांनी एजंटसना दक्ष रहायला सांगणे जरुरीचे आहे. १७ सी फॉर्म्स जपून ठेवणे अत्यंत निकडीचे आहे. केवळ पक्षाच्या एजंटसनीच नव्हे तर आपण सर्व नागरिकांनी अतिशय सावध राहिले पाहिजे. वोटर टर्नआउट अ‍ॅप्लीकेशनवरचे आकड्यांचीही नोंद ठेवली पाहिजे. त्यावर स्क्रीनशॉट घेता येत नाही, असे पूनम अग्रवाल यांनी आजच नोंदवले आहे त्यामुळे आणखी सावध राहिले पाहिजे.

थोडक्यात, निवडणूक आयोगाला उत्तरदायी बनवले पाहिजे. कोणीही जिंकेल, हरेल; पण प्रक्रिया नीट पार पडली पाहिजे. मुख्य म्हणजे, देशाचे संविधान आणि लोकशाही हे सारे शाबूत राहिले पाहिजे.

त्यासाठी वोट फॉर इंडिया ! जय हिंद !

लोकसंसद

## उदासीन मतदारांची मानसिकता बदलणे गरजेचे

यंदाच्या लोकसभा निवडणुकीच्या तीन टप्प्यात पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत मतदानाची टक्केवारी घसरलेली आढळली. उरलेल्या टप्प्यातही ही टक्केवारी फारशी समाधानकारक असेल असे वाटत नाही. तसं पाहायला गेलं तर मतदानाची टक्केवारी नेहमीच सरासरी ६० टक्क्याच्या आसपास असते. चाळीस टक्के मतदार मतदानाचा हक्क बजावत नाहीत. गंमतीची बाब म्हणजे याच चाळीस टक्क्यातील लोक सरकार, प्रशासन यावर टीका करण्यात आघाडीवर असतात. समाजमाध्यमामुळे मतदानाविषयी मोठ्या प्रमाणावर जनजागृती होत आहे हे खरे असले तरी मतदानप्रक्रियेविषयी मुळातच असलेली उदासीनता ही खरी समस्या आहे. कुठलेही सरकार येऊ दे मला काय फरक पडतो असा एक साधारण मतप्रवाह या उदासिन मानसिकतेतून पुढे येतो. साहजिकच मतदान करणे या वर्गाकडून टाळले जाते. त्यातच सुट्टीला जोडून मतदानाचा दिवस आला तर पर्यटनाचे बेत आखले जातात. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरणे हे क्रमप्राप्तच ठरते. निवडणूक आयोगाकडून मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी बरेच उपक्रम राबवले गेले, जनजागृती केली गेली तरी उदासीन मतदारांच्या मानसिकतेत बदल होत नाही हेच खरे दुखणे आहे. **- दीपक गुंडये,** वरळी

मराठी साहित्यिक दिनविशेष

**१४ मे**

**१६५७:-** धर्मवीर संभाजीराजे यांचा पुरंदर किल्ल्यावर जन्म. संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते आणि 'बुधभुषण' हा संस्कृत काव्यात्म ग्रंथ त्यांनी लिहिला होता. हे त्यांचे 'महाराष्ट्र सारस्वता'तील योगदान. 'बंधुभूषण'चा आधार त्या काळाची परिस्थिती अभ्यासण्यासाठी आजही काही जण घेतात. १९०४ : पत्रकार, नाटककार, कथा-कादंबरीकार, बालसाहित्य लेखक आणि कवी म्हणून नावाजलेले व्यंकटेश शंकर वकील यांचा जन्म १४ मे १९०४ रोजी झाला. बी.ए. झाल्यावर मुंबईच्या नवभारत दैनिकात स्तंभलेखक तसेच 'वागिश्वरी' या मासिकातून कथा, कविता, विनोदी लेख त्यांनी लिहिले. बरेचसे लेखन त्यांनी गिरिजाशंकर त्रिपाठी, श्रीयुत चक्रम आणि बी.ए. नापास या नावानी केले. 'संजीवन' या दीर्घ कवितेमुळे, ब्रिटिशांनी त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप करून त्यांना एक वर्षाचा सश्रम कारावास ठोकला. 'पिंपळपान' हा त्याचा काव्यसंग्रह तर 'अश्रू फुले', तिसरे रुप', तृणाकूर 'धूमकेतू' हे त्यांचे कथासंग्रह, याशिवाय 'जन्माचे सोबती' हे नाटक, 'भिमीची 'सवत' ही नाटिका, जळती घरे, नव्या ज्योती व तीन घटका हे एकांकिकासंग्रह त्यांचे प्रसिद्ध झाले. वकिलांच्या नावावर काही अनुवादित साहित्यही आहे. यामध्ये राहुल सांकृत्यायन यांचा 'व्होल्गा ते गंगा' या पुस्तकाचा अनुवाद, त्याशिवाय श्रावणातील खेडे, माती, (पर्लबकः गुडअर्थ), दोन बिघे जमीन (जॉन स्टाइन बेक), चतुरंग (रवींद्रनाथ ठाकूर) 'व्याकुळला जीव असा' (स्टीफन इवाइंग) 'कथानिकेतन' आदींचा समावेश आहे. तसेच तुलसी रामायणाचे आठ भाग. तेनालीरामा, मुलांचा इसाप, आमचे अण्णा ही कुमारवयातील मुलांसाठी त्यांनी पुस्तके लिहिली. इनर्सनच्या निवडक साहित्याचा परिचय करून देणारे पुस्तकही त्यांनी लिहिले. जनसाहित्य आणि गांधी विचारमाला या अनुवादित साहित्यांबरोबर अनेक रहस्यकथाही त्यांनी लिहित्या. अशा या चतुरस्त्र साहित्यिकाचे २८ मे १९७६ रोजी निधन झाले. **१९१४:-** लेखिका प्रभावती रामचंद्र पुरम यांचा जन्म. यांची 'भरतकाम' व 'शिवणकला' ही पुस्तके प्रकाशित. **१९२३:-** 'इंदुप्रकाश'च्या इंग्रजी आवृत्तीचे संपादक आणि पुढे हिंदू धर्मसुधारक, जातिवर्णविरोधी लढाईला वैचारिक बैठक देणारे, कायदेपंडित, मुंबईचे मुख्य न्यायाधीश व इंदुरचे मुख्यमंत्री सर नारायण गणेश चंदावरकर यांचे निधन. त्यांचे बहुतेक लेखन इंग्रजीत असले, तर मराठीत त्यांच्या व्याख्यानांचे संकलन प्रसिध्द झाले होते. **१९३६:-** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु व साहित्यिक उत्तम बाजीराव भोईटे यांचा जन्म. ११ पुस्तके आणि २७ शोधनिबंध त्यांच्या नावावर आहेत. **१९३८:-** लेखिका, बालसाहित्यिक डॉ. सुनिता विश्वनाथ कावळे यांचा जन्म. 'ओवाळणी', 'शहाणी मुलं', 'अंतराळ' हे बालकथासंग्रह. 'लख्ख प्रकाश' ही बालकांदबरी. तसेच 'उत्तर', 'कमला लेले' या कादंबऱ्या. 'कोरी पाटी', 'उसवलेले आभाळ' हे कथासंग्रह. 'सुरुंग', 'कमलाबाई होस्पेट' ही नाटके आणि नॅशनल बुक ट्रस्ट दिल्लीसाठी काही अनुवादीत साहित्य त्यांनी लिहिले आहे. **१९४१:-** लेखिका अरुंधती गंगाधर महाम्बरे यांचा जन्म. 'भारतीय कुमारांच्या साहसकथा', 'मंतरलेला पेला', तसेच 'भुवनशोम', 'वाळवी', 'सात हिंदुस्थानी' ह्या त्यांच्या अनुवादीत कादंबऱ्या आणि 'घमंडी' हा अनुवादीत कथासंग्रह प्रसिध्द. **१९४२:-** लेखक, कथाकार श्री. मनोहर दत्ताराम कोरगांवकर यांचा जन्म. 'ओंजळे' हा काव्यसंग्रह. 'आवाज मनातला', 'जसे पहावे तसे' व 'पलिकडचे मन' हे ललितविषयक तसेच 'दायित्व' हा सामाजिक विषयाचा कथासंग्रहासह आणि तसेच 'शिक्षण वाचा आणि वळणे' हे शैक्षणिक विषयावरील पुस्तकेविषयक लेख त्यांनी लिहिलेत. 'शिक्षणातील कवडसे' हे त्यांचे पुस्तक प्रसिध्दीच्या मार्गावर. **१९४४:-** लेखिका अलकाताई पंढरीनाथ चंद्रशेखकर यांचा जन्म. यांचा 'मुक्या पाखराचे थवे' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९६९:-** लेखक संजय सत्यवान म्हस्के यांचा जन्म. 'कीचन' ही कादंबरी त्याची प्रकाशित कादंबरी झाली आहे. **१९८६:-** लेखक, आंतरजातीय विवाहाचे अभ्यासक डॉ. पंढरीनाथ रामचंद्र मोकाशी यांचे निधन. ह्यांनी 'दलित-सवर्ण विवाह', 'शोध आणि बोध' या ग्रंथातून ५० जोडप्यांच्या मुलाखती याशिवाय 'नाथ', 'महानुभाव', 'वारकरी', 'दत्त', 'समर्थ संप्रदाय' याविषयी 'महाराष्ट्रातील पाच संप्रदाय' हा ग्रंथ लिहिला. **२०००:-** लेखक तत्त्वज्ञानाचे अभ्यासक प्रा.डॉ.अंकुश सावंत यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'पेटलेली पूर्व' ही कादंबरी पूर्व बंगालच्या समस्यांवर आधारित आहे. 'मनुस्मृती एक समालोचन' या ग्रंथातून. मनूच्या विविधांगी आणि सर्वस्पर्शी तत्त्वज्ञानाचं समालोचन वस्तुनिष्ठपणे करण्याचा लेखकाने प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. तसेच लोकहितवादी, फुले, आगरकर, आंबेडकर या समाजसुधारकांच्या कार्याचा आढावाही प्रस्तुत ग्रंथातून लेखकाने घेतला आहे. 'प्लेटोचे आदर्शराज्य' यातून या पाश्चात्य विचारवंतांच्या तत्त्वज्ञानाचा एक चिकित्सक अभ्यास लेखकाने केला.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# नागोठण्यात अवकाळीने दाणादाण

**। नागोठणे । वार्ताहर ।**

**नागोठणे परिसरात गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. त्याचे रुपांतर रविवारी (दि.१२) रात्री पावसाच्या शिडकाव्यात झाले. रविवारी रात्री पडलेला पाऊस हा तुरळक होता. मात्र, सोमवारी (दि.१३) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास अचानक अवकाळी पावसाच्या सरी आल्यामुळे सर्वसामान्य लोकांबरोबरच शेतकऱ्यांची व वीटभट्टी व्यावसायिकांचीदेखील तारांबळ उडाली. या पावसामुळे वीटभट्टीचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.**





अवकाळीपावसानेविटाबनवण्यासाठी लागणारी माती वाहून गेली. त्याचप्रमाणे भट्टीत टाकलेल्या विटांचेदेखील नुकसान झाले आहे. अचानक आलेल्या या अवकाळी पावसामुळे नागोठणे विभागातील वीटभट्ट्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असल्याने नुकसानग्रस्त वीटभट्ट्यांचे पंचनामे करून शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी वीट व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे.

## वीटभट्ट्यांसह शेतकऱ्यांचे नुकसान

रायगड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांत काही दिवसांपासून अचानक वाऱ्यांसह मुसळधार अवकाळी पाऊस कोसळत आहे. यामध्ये नागोठणे परिसराचाही आता समावेश झाला आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांसह वीट व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी व वीटभट्टी व्यवसायिक मेटाकुटीला आले आहेत. वीटभट्टी व्यावसायिकांनी तयार करुन ठेवलेल्या कच्च्या विटांवर पडलेल्या पावसाने विटांची पूर्णतः माती झाली असल्याचे काही वीटभट्टी व्यावसायिकांनी सांगितले. काहींनी पाऊस पडायला सुरुवात होताच कच्च्या विटांवर तात्काळ ताडपत्री टाकण्यासाठी धडपड केली, मात्र ताडपत्री घेऊन वीटभट्टीवर पोहोचेपर्यंत उशीर झाल्याने कच्च्या विटांचे पावसामुळे नुकसान झाले. आधीच कोरोनोचे संकट, नंतर चक्रीवादळ, त्यात हा पडणारा अवकाळी पाऊस त्यामुळे रॉयलटीच्या रूपाने शासनाची तिजोरी भरणारे वीट व्यावसायिक आज आर्थिक संकटात सापडले असून, डोक्यावर कर्ज घेऊन उभारलेला वीट व्यवसाय आज धोक्यात आला आहे. तरी शासनाने याची वेळीच दखल घेऊन या नुकसानग्रस्त वीट व्यावसायिकांना आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

> **अवकाळी पावसामुळे वीटभट्टी व्यावसायिकांना नुकसानीला सामोरे जावे लागते; परंतु शासनाकडून कोणतीही मदत होत नाही. अवकाळीमुळे नुकसान झालेल्या वीटभट्टीचे पंचनामे करून नुकसानभरपाई दिली जाते. त्याचप्रमाणे आमच्या वीटभट्टीचे पंचनामे करून सरकारने आम्हाला देखील नुकसानभरपाई द्यावी.**
> **– निखील मढवी, अध्यक्ष, नागोठणे विभाग वीटभट्टी संघटना**

# उकाड्याने मुरुडकर हैराण

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**



**तापमान ३९ सेल्सियस**
**वाढते तापमान धोकादायक**

तापमान वाढते असल्याने सर्वच जण हवालदिल झाले आहेत. पर्यटन तालुका असणाऱ्या मुरूड तालुक्यातील तापमान सोमवारी दुपारी जवळजवळ ३९ वर गेल्याने घरातदेखील बसणे अवघड बनल्याचे जाणवले. दुपारी मुरूड, मजगाव, नांदगाव, बोर्ली आदी मोठ्या बाजारपेठादेखील सुनसान दिसून आल्या. अवकाळी पाऊस येऊन हवेत काहीसा थंडावा येईल ही अपेक्षादेखील फोल ठरल्याचे दिसून आले. प्रचंड उकाड्याने मुरुडकर हैराण झाल्याचे दिसून आले. यावर्षी प्रचंड उष्णतामान वाढल्याने सर्वत्र चिंतादेखील व्यक्त झाली आहे.पशुपक्षी, प्राणी आणि मानवालादेखील वाढत्या तापमानाची मोठी झळ लागत असून, थंडावा घेण्यासाठी अनेक मार्ग शोधत आहेत.

मुरूडसारख्या समुद्रकिनारी असणाऱ्या तालुक्यात सामान्यपणे तापमान दमट असते.हवेत मिठाचा अंश असल्याने शरीराच्या अंतर्गत भागात घाम येऊन खाज येऊ शकते. परंतु, वातावरणीय समतोल बिघडल्याने समुद्रकिनारीदेखील तापमान वाढून ४० ते ४१ सेल्सियसपर्यंत गेल्याचेदेखील अनुभवायला मिळाले आहे. अवकाळी पाऊस, तौक्ते, निसर्ग सारखी वादळे, वाढते तापमान अशा संकटांची यादी पाहिली की भविष्यात मानवापुढे कशी संकटे येऊ शकतात याचा सिग्नल निसर्ग देत आहे. समुद्रातील वाढते प्रदूषण, बेसुमार बेकायदेशीर होणारी वृक्षतोड, धूर ओकणारे केमिकल कारखाने, वाहनांचे प्रदूषणासह अनेक धोकादायक गोष्टींमुळे समतोल वातावरणाचा तोल सांभाळण्यापलीकडे गेला असून, त्याचाच हा सर्व परिणाम असल्याचे दिसून येत आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१४ मे
१) श्री. हेमंत वामन चेवले अलिबाग १४-५-१९५१
२) श्रीम.शोभना मोहन जगे अलिबाग, १४-५-१९४८
३)श्रीम.गीता देवराम म्हात्रे रामनाथ, अलिबाग १४-५-१९४८
४)श्रीम.निर्मला विष्णु आहेर चेंढरे, अलिबाग १४-५-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**स्व. श्रीमती कलावती भवानजी देढीया, स्मरणार्थ महावीर ट्रेडर्स बाजारपेठ अलिबाग**



**अन्वय अभिजित घोडिंदे, वाढदिवस, अलिबाग**



**कु. युवराज अक्षय जाधव, वाढदिवस, पनवेल**

## सुतारवाडीत तुरळक पाऊस

**सुतारवाडी :** गेल्या अनेक दिवसापासून प्रचंड प्रमाणावर उष्णा जाणवत होता. परंतु, दि. १३ मे रोजी अचानकपणे दुपारी एकच्या सुमारास काळोख करून मेघगर्जनेसह तुरळकपणे पडलेल्या पावसाने अनेकांना दिलासा मिळाला. सध्या अगोटीची कामे सुरू असून, शेतकरीवर्ग त्याचप्रमाणे घर दुरुस्तीची कामे ग्रामीण भागात ठिकठिकाणी सुरू आहेत. अशातच काळोख करून आलेल्या पावसाने अनेकांची तारांबळ उडाली. हवेत गारवा आल्याने थोड्या प्रमाणावर अनेकांनी सुस्कारा सोडला.

# शेळ्या-मेंढ्यांची अवैध वाहतूक

**। पनवेल। वार्ताहर।**

प्रमाणापेक्षा जास्त शेळ्या-मेंढ्या ट्रकमध्ये भरून त्यांना क्रूरपणे वागणूक देऊन त्यांच्या अन्नपाण्याची व प्रथमोपचारची व्यवस्था न करता अवैध वाहतूक केल्याप्रकरणी दोघांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

खारघर पोलीस ठाणे हद्दीतून लेलँड ट्रक क्रमांक जीजे ०१ एचटी ६१३३ आणि जीजे ०१ केटी ८३९३ मधून बकऱ्यांची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी हिरानंदनी ब्रिज येथे दोन्ही वाहनांची तपासणी केली. आतमध्ये बकरे आणि मेंढ्या आढळून आल्या. त्यांच्या वाहतुकीबाबत, परवानाबाबत विचारले असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याचे सांगितले व बकरे व मेंढ्या अहमदाबाद गुजरात येथून खरेदी करून कर्नाटक येथे घेऊन जात असल्याचे सांगितले. खरेदीबाबत त्यांनी कोणतेही कागदपत्रे सादर केली नाहीत. फारूक मोहम्मद शेख भूमा ओंकार राम याच्याकडील दोन ट्रकमध्ये प्रमाणापेक्षा जास्त मेंढ्या भरून त्यांना क्रूरपणे वागणूक देऊन त्यांची अन्नपाण्याची व प्रथमोपचाराची व्यवस्था केली नाही. दोन्ही ट्रकमधून ३१० शेळ्या-मेंढ्यांची डांबून, कोंबून भरून अवैध वाहतूक करत असताना मिळून आल्याने दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# जनावरांची चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल परिसरातून तीन मुक्या जनावरांची चोरी केल्याची घटना घडली आहे. तालुक्यातील देहरंग येथील सत्कम् श्रद्धा गोशाळेतून अज्ञात चोरट्यांनी एक बैल चोरून नेला आहे, तर दुसऱ्या घटनेत चिंध्रण गावातील एका घराबाहेर बांधलेल्या दोन बैलांची चोरी करण्यात आली आहे. या तीन जनांवरांची किंमत जवळपास पंधरा हजार रुपये इतकी आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# मुरुडमध्ये स्वच्छतागृह पूर्ववत

## कृषीवलचा पाठपुरावा; प्रशासनास जाग

**। कोर्लइ । वार्ताहर ।**

मुरुड किनाऱ्यावरील नगरपरिषदेच्या स्वच्छतागृहाला गेल्या दोन दिवसांपासून टाळे असल्याने अनेक पर्यटकांची गैरसोय झाली. पाण्याची मोटार बंद पडल्याने पाणी उपलब्ध होत नाही, म्हणूनच ठेकेदाराने हे स्वच्छतागृह टाळे लावून बंद केले असल्याचे स्टॉलधारकांनी सांगितले. याबाबतचे वृत्त कृषीवलमध्ये प्रसिद्ध होताच तातडीने दखल घेण्यात येऊन हे स्वच्छतागृह पूर्ववत सुरु करण्यात आले आहे.




मे महिना सुरू असल्याने शनिवारी व रविवारी विकेंडसाठी पर्यटकांची मुरुड किनारी रेलचेल असते. सध्या पर्यटकांची संख्या रोडावली असली तरी बहुतांश भागात लोकसभेच्या निवडणुका सुरू असल्याने याचा पर्यटनावर परिणाम दिसून येत आहे. मुरुड बीचवरही पर्यटकांची तुरळक गर्दी दिसून येत आहे. दरम्यान, येणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होऊ नये म्हणून मुरुड नगरपरिषदेतर्फे समुद्रकिनारीच स्वच्छतागृह बांधलेले आहेत. या स्वच्छतागृहाची जबाबदारी खाजगी ठेकेदारांना देण्यात आलेली आहे. परंतु गेल्या दोन दिवसांपासून स्वच्छतागृहाला जवळील असलेल्या विश्रामबागेतील विहिरीतून मोटारद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो, त्या विहिरीत मोठ्या प्रमाणावर शेवाळे साचल्याने जलवाहिनी चोकअप होऊन पाणीपुरवठा बंद झाल्याने पर्यटकांची गैरसोय झाली.

# 'सीएनजी'साठी वाहने रस्त्यावर

## वाहनचालकांचे महामार्गावर हालच

**। महाड । वार्ताहर ।**

पेट्रोल, डिझेलच्या वाहनांना पर्याय म्हणून सीएनजीवर चालणारी वाहने अनेक कंपन्यांकडून उत्पादित करण्यात आली. मात्र सीएनजी पंपांच्या कमतरतेमुळे आणि पंपांवर होत असलेल्या मनमानीमुळे सीएनजी वाहनचालकांचे प्रचंड हाल होत आहेत.



मे महिन्याच्या सुट्ट्या पडल्यामुळे कोकणामध्ये पर्यटकांची मोठी गर्दी आहे, त्याचबरोबर कोकणात सुट्ट्यांसाठी चाकरमानीदेखील दाखल झालेले आहेत. या सर्व वाहन चालकांना मुंबई-गोवा महामार्गावर सीएनजीअभावी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सीएनजी पंपांवर कधीकधी तासन्तास उभे राहावं लागत आहे. त्यातच सीएनजी संपल्यास रांगेत उभ्या असलेल्या वाहन चालकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.

रायगड आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग यादरम्यान फारच कमी सीएनजी पंप आहेत. पनवेल सोडल्यानंतर पेण, रोहा, नागोठणे, माणगाव, इंदापूर, आणि पुढे थेट खेडमध्ये सीएनजी पंप उपलब्ध होता. नुकताच महाड आणि पोलादपूर मध्ये सीएनजी पंप सुरू करण्यात आलेला आहे. महानगर गॅसच्या माध्यमातून हे पंप सुरू झालेले आहेत. सीएनजी पंपांवर सीएनजीने भरलेल्या दिवसाला दोन ते तीन गाड्याच दाखल होत असतात. सीएनजी उपलब्ध झाल्याचे समजतात पंपाबाहेर अर्धा ते एक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागत आहेत. रांगेत असतानाच पंपामधील सीएनजी संपल्यानंतर वाहन चालकांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे. त्यातच अनेक वेळा वीज खंडित झाल्यास किंवा पंपामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास सीएनजी भरण्यास आलेल्या वाहन चालकांना ताटकळत उभे राहावे लागते.

महाडमध्ये नुकत्याच सुरू झालेल्या महानगर गॅसच्या पंपामध्ये दिवसाला तीन गाड्या उपलब्ध होतात. यामध्ये साधारण ४०० पासून १ हजार किलोपर्यंत सीएनजी उपलब्ध होतो. सध्याच्या काळामध्ये मागणी अधिक असून, महानगर गॅसकडून कमी पुरवठा होत असल्याचेदेखील महाडमधील पंपाच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. उपलब्ध गॅस हा केवळ तीन ते चार तास उरतो, त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या आणि मुंबईकडून पुन्हा सिंधुदुर्ग, गोवा, दापोलीकडे जाणाऱ्या पर्यटकांचे मोठे हाल होत आहेत.

# वाहन चालकाला लुटले

**। पनवेल । वार्ताहर ।**

लघुशंका करण्यासाठी गेलेल्या वाहन चालकाला लुटल्याप्रकरणी चार अनोळखी इसमांविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जितलाल महतो हा वावोशी, खालापूर येथे राहात असून, हायवा डंपर क्रमांक एम.एच. ४६ एफ ३७४० वर चालक म्हणून काम करतो. मालक इमरान खान याच्या सांगण्यावरून कोळसा भरण्याकरिता करंजा पोर्ट, उरण येथे तो गेला होता. त्यानंतर डंपरमध्ये कोळसा भरला आणि कोळसा वावोशी खालापूर येथे घेऊन जात असताना पहाटे साडेतीनच्या सुमारास मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे वरती पळस्पे हायवे ट्रॅफिक चौकीच्या थोडे पुढे जाऊन डंपर थांबून टायरमधील हवा चेक केली आणि लघुशंका करत असताना डंपरच्या पाठीमागून एक इसम आला. त्यावेळी त्याला काय झाले असे विचारले असता त्याने महतो याला हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तीन इसम त्या ठिकाणी आले आणि त्यांनीदेखील मारहाण करून महतो याच्या खिशातील मोबाईल, ब्लूटूथ हेडफोन आणि रोख रक्कम हिसकावून घेऊन ते पळून गेले. चारही इसम २० ते २५ वयोगटातील होते. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

पान ३ वरुन

## नेरळ आनंदवाडी केंद्रामध्ये सर्व कर्मचारी दिव्यांग

कर्मचाऱ्यांची नियुक्ती निवडणूक विभागाने केली होती. नेरळ ग्रामपंचायतीमधील ८१ नंबर चे मतदान केंद्र असलेल्या आनंद वाडी केंद्रावरील सर्व निवडणूक कर्मचारी हे दिव्यांग होते. त्या विभागाचे झोनल अधिकारी म्हणून कर्जत भात संशोधन केंद्रातील अधिकारी डॉ. रवींद्र मर्दाने, तर त्यांच्या मदतीला मतदान केंद्रप्रमुख म्हणून कैलाश घाडके, तर सहायक म्हणून नितीन मच्छिंद्र भानवसे, रमेश विठ्ठल संतपाल, जनार्दन नारायण तांबे आणि शिपाई म्हणून प्रभाकर पंढरीनाथ कर्णुक तर बीएलओ म्हणून काम करणारे कर्मचारीदेखील अपंग होते आणि त्यांनी निवडणूककामी मदत केली. दुपारी मतदान प्रक्रिया सुरू असताना मावळ लोकसभेच्या कर्जत विधानसभा मतदारसंघ सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी भेट देऊन पाहणी केली.

## अल्पावधीत पर्यायी जागा

सायंकाळी चार वाजता तयार झालेली पाहून कर्जत विधानसभा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित नैराळे यांनी आपल्या सर्व यंत्रणेला सोबत घेऊन प्रशासकीय भवन येथे सीलबंद मतदान यंत्र संकलित करून घेण्यासाठी पर्यायी जागा निर्माण करण्यासाठी काम सुरू केले. राखीव पोलीस आणि राखीव कर्मचारी तसेच उपलब्ध कर्मचारी यांच्या मदतीने प्रशासकीय भवनाच्या तळमजल्यावर अल्पावधीत सर्व यंत्रणा तयार केली. त्यानंतर मतदान संपल्यावर आलेल्या मतपेट्या या थेट प्रशासकीय भवन येथे संकलित करण्यास सुरुवात झाली. सर्व ३३९ मतदान केंद्रांवरील मतपेट्या संकलित करून रात्रीच मावळ लोकसभा मतदारसघ यांचे स्ट्राँग रूम असलेल्या बालेवाडी येथील क्रीडा संकुल येथे नेण्याची तयारीदेखील कर्जत निवडणूक यंत्रणेकडून करण्यात आली आहे. कर्जत येथे नव्याने निर्माण झालेल्या परिस्थितीबद्दल माहिती होताच जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे तातडीने कर्जत येथे पोहोचले आहेत. त्यांनी आपले राखीव पोलीस यांना प्रशासकीय भवन आणि परिसरात चोख बंदोबस्त ठेवण्याचे सूचना दिल्या आहेत. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पावसाचा अंदाज घेऊन सायंकाळपासून मतपेट्या संकलित करण्यासाठी पर्यायी जागेचा विचार करून कार्यवाही सुरू केल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

## मतदार यंत्रांमध्ये बदल

**(३ बीयु, २ सीयु, १ व्हीव्हीपॅट) मतदान यंत्रांचा समावेश होता. मतदान प्रक्रिया सुरू असताना चिंचवड विधानसभा मतदारसंघात १२ बीयु, ४ सीयु आणि ७ व्हीव्हीपॅट बदलण्यात आले. तर पनवेलमध्ये ४ व्हीव्हीपॅट, कर्जतमध्ये ६ व्हीव्हीपॅट, उरणमध्ये २ व्हीव्हीपॅट, मावळ ६ व्हीव्हीपॅट आणि पिंपरी २ व्हीव्हीपॅट यंत्र बदलण्यात आले.**

## मावळचा सुभेदार कोण?

**११ मे रोजी प्रचार थांबले. त्यानंतर सोमवारी १३ मे रोजी सकाळी सात वाजल्यापासून पनवेल, कर्जत, उरण, मावळ, चिंचवड, पिंपरी या सहा मतदारसंघात मतदानाला सुरुवात झाली. काही मतदारांनी विकासकामे न झाल्याने मतदान करण्यावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, मतदान आपले कर्तव्य आहे, हे ओळखून मतदान केंद्रामध्ये मतदान करण्यासाठी सरसावले. दुपारी उन्हामुळे काही मतदार मतदान करण्यासाठी गेले नाही, तर काही मतदार उन्हाचा चटका बसत असतानादेखील मतदान करण्यासाठी केंद्रावर रांगेत उभे असल्याचे दिसून आले. दुपारनंतर मतदान करण्यासाठी पुढे आलेल्या मतदारांना अवकाळी पावसाची अडकाठी आली. मात्र, पाऊस थांबल्याने पुन्हा वेगळ्या उमेदीने मतदार मतदान करण्यासाठी पुढे आले. सायंकाळी पाच वाजेपर्यंत सरासरी ४६.३ टक्के मतदान झाले. सायंकाळी सहा वाजेपर्यंत अंदाजे ५१ टक्के मतदान झाल्याचे सांगण्यात आले.**

## दिग्गजांनी बजावला मतदानाचा हक्क

मावळ लोकसभा मतदार संघाच्या निवडणुकीचे मतदान सोमवारी (दि. १३) सकाळी सात वाजल्यापासून सुरु झाले. मतदार संघातील मतदारांसह वेगवेगळ्या राजकीय पक्षातील दिग्गजांनी मतदानाचा हक्क बजावला. त्यामध्ये माजी आ. मनोहर भोईर, माजी आ. बाळाराम पाटील, पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे. प्रितम म्हात्रे, उमेदवार संजोग वाघेरे, उरणचे तालुका चिटणीस विकास नाईक, आरती नाईक, खालापूरमधील शेकापचे नेते संतोष जंगम, खालापूरच्या माजी नगराध्यक्षा शिवानी जंगम, पनवेलचे तालुका चिटणीस राजेश केणी, खालापूरचे तालुका चिटणीस किशोर पाटील, निनीत सावंत, एकनाथ पिंगळे, आदींनी मतदानाचा हक्क बजावला. यावेळी शेकापचे नेते आ. जयंत पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, माजी मंत्री सचिन अहिर, शेकापचे जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, युवा नेते सवाई पाटील आदी प्रमुख मंडळी उपस्थित होती. राज्यात सकाळी ९ वाजेपर्यंत ६.४५ टक्के मतदान झालं

## वादळी वाऱ्यासह गारपीट

झाडांच्या महाकाय फांद्या तुटून घरांचे नुकसान झाले. नेरळ कळंब रस्त्यावरील अवसरे गावाजवळ रस्त्यावर असलेले झाड कोसळले. त्याचवेळी कळंब वांगणी रस्त्यावर असलेल्या आरडे गावाच्या रस्त्यावर झाड कोसळले, त्यामुळे एसटी बस अडकून पडली. भाजीपाला शेती आणि वीटभट्टी उत्पादकांचे मोठे नुकसान झाले असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे.

## खुन्याला २४ तासांत जेरबंद

अटक केली आहे.

याबाबत हकीकत अशी की, भानुदास भिवा चौधरी हे कलोते फाट्यावर वडापाव चहाचे दुकान होते. नेहमीप्रमाणे दुकान बंद करुन घरी जात असताना त्या दिवशी हॉटेलमध्ये झोपण्याचा निर्णय घेतला. मात्र याची माहिती आरोपीस कळताच त्यांचा सहकारी मारुफ उर्फ मेहबुब हसमत अली, मूळ रा. उत्तरप्रदेश, सध्या कलोते राहात असून, या दोघांनी संगनमत करुन चौधरी यांचा गळा दाबून त्यास जिवे ठार मारले. पोलिसांनी गोपीनीय माहिती घेऊन आरोपीपर्यंत पोहोचून त्यास पोलिसी खाक्या दाखविताच आपण खून केल्याचे कबूल केले. सदरची कामगिरी सोमनाथ घार्गे, पोलीस अधीक्षक रायगड, अतुल झेंडे, अपर पोलीस अधीक्षक रायगड, विक्रम कदम, उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मिलिंद खोपडे, पोलीस निरीक्षक, खालापूर पोलीस ठाणे, सपोनि मनिष मोरे, सपोनि सूर्यवंशी, पोउनि/आरोटे, मपोउनि/सरीता मनवर, पोउनि रोहिदास भोर, पोउनि/शिवाजी जुंदरे, सहा. फौजदार सुभाष म्हात्रे, पोलीस हवालदार रतन बागुल, नितीन शेडगे, निलेश कांबळे, अमित सावंत, विशाल शिंदे, हेमंत कोकाटे, शरद फररांदे, रणजीत खराडे, मनोज सिरतार, चंद्रकांत पयेर, आशिष पाटील, महिला पोलीस हवालदार हेमा कराळे, अंकिता चिंबुळकर, प्रतिक्षा म्हात्रे, दिक्षा पवार यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.

## लक्षवेधी लढती

शिरूर : अमोल कोल्हे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट)- शिवाजीराव आढळराव पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस), अहमदनगर : निलेश ज्ञानदेव लंके (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट)- सुजय राधाकृष्ण विखे पाटील (भाजप), शिर्डी : भाऊसाहेब राजाराम वाकचौरे (उबाठा)-सदाशिव लोखंडे (शिवसेना), बीड : बजरंग सोनवणे (राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट)- पंकजा मुंडे (भाजप)

# माझा विजय होईल : संजोग वाघेरे

**। उरण । वार्ताहर ।**

मतदारांमधील उत्साह पाहता महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून माझा विजय होईल, असा विश्वास संजोग वाघेरे यांनी व्यक्त केला आहे. पार्थ पवार यांचा २०१९ च्या निवडणुकीत पराभव झाला. याबद्दल अद्यापही मनात दुःख आहे. तेव्हा मी राष्ट्रवादी पक्षाचा शहराध्यक्ष होतो. अशी आठवण करून देत या पराभवाचा वचपा काढण्यासाठी सज्ज असल्याचं अप्रत्यक्षपणे वाघेरे म्हणाले आहेत. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे विरुद्ध महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात चुरशीची लढत आहे. दोन्ही उमेदवारांनी मोठं शक्तिप्रदर्शन करत प्रचार केलेला आहे. आज त्यांचं नशीब ईव्हीएममध्ये बंद झाले. दरम्यान, गेल्या दहा वर्षांत बारणे यांनी मावळ लोकसभा मतदारसंघात म्हणावा तसा विकास केला नाही. या कारणाने मतदार नाराज आहेत. यामुळेच माझ्या विजयाचा विश्वास अधिक वाढल्याचं संजोग वाघेरेंनी म्हटले आहे. ही निवडणूक मतदारांनी हातात घेतलेली आहे, असंही त्यांनी अधोरेखित केलं.

पार्थ पवार यांच्या पराभवावर प्रश्न विचारल्यानंतर वाघेरे म्हणाले, त्यावेळी मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा शहराध्यक्ष होतो. पार्थ पवार यांचा विजय व्हावा यासाठी आम्ही कामही केलं. मात्र, त्यांचा श्रीरंग बारणे यांनी पराभव केला. त्याचे आजही मनात दुःख निश्चितच आहे.

मावळ लोकसभा मतदार संघातील आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी मन लावून काम केले. त्याचबरोबर विरोधी पक्षातील एकेकाळचे सहकारी असल्यानेही अप्रत्यक्षपणे मदत केली असल्याने आपला विजय नक्कीच होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## मावळ मतदारसंघात शांततेत मतदान

**मावळ :** वयोवृद्ध, महिला आणि दिव्यांग तसेच इतर मतदारांसह नवोदित मतदारांनी मावळ लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या मतदानाचा हक्क बजावत लोकशाहीच्या महाउत्सवात सहभाग घेतला. मावळ लोकसभा मतदारसंघात सुरळीत व शांततापूर्ण वातावरणात मतदान प्रक्रिया पार पडली असून अंदाजे सरासरी ५२.३० टक्के मतदान झाले आहे, अशी प्राथमिक माहिती मावळ लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली. आपल्या आशा आकांक्षांचे प्रतिबिंब उमटविण्यासाठी भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा पवित्र हक्क बजावताना युवा युवतींच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. निवडणूक प्रशासनाने मतदान केंद्रांवर दिलेल्या विविध सोयीसुविधांबद्दल मतदारांनी समाधान व्यक्त केले.

# मावळचा खासदार ठरविण्यासाठी मतदारांनी केले मतदान


















मावळ लोकसभा मतदारसंघाची सार्वत्रिक निवडणूक सोमवारी (दि. १३) पार पडली. या निवडणुकीमध्ये रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, कर्जत तर पुणे जिल्ह्यातील मावळ, चिंचवड आणि पिंपरी या सहा विधानसभा मतदार संघातील मतदारांनी मतदान केले. दोन दिवसांपूर्वी ८५ वर्षावरील आणि दिव्यांग मतदानाचे गृहमतदान निवडणुक विभागाच्या यंत्रणेमार्फत घेण्यात आले होते. सोमवारी मतदानाच्या दिवशी या सहाही विधानसभा मतदारसंघामधील मतदान केंद्रावर मतदानासाठी मतदारांनी गर्दी करुन आपले कर्तव्य बजावले. मतदान प्रक्रिया संथ गतीने सुरु असल्याने सायंकाळी ५ वाजेपर्यंत ४६.३ टक्के मतदान झाले होते. उशिरापर्यंत काही मतदान केंद्रांवर मतदानासाठी रांगा लागलेल्या पहावयास मिळाल्या. काही तुरळक प्रकार वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.









## सेल्फी पॉईंटचा घेतला मतदारांनी आनंद

मोबाईलमधून सेल्फी काढण्याची मज्जाच एक वेगळी असते. हल्ली सेल्फी काढण्यावर अनेक जण भर देतात. प्रशासनाने मतदारांना आकर्षित करण्यासाठी तसेच मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी मतदान केंद्रात सेल्फी पॉईंट ठेवले. काही मतदान केंद्र फुलांसह फुग्यांनी सजवले होते. काही मतदान केंद्रामध्ये सेल्फी पॉईंट ठेवले होते. मतदान केल्यावर अनेक मतदारांनी सेल्फी पॉईंटचा आनंद घेतला. त्यामध्ये तरुणाईचा उत्साह अधिक दिसून आला.

## व्हीलचेअर धूळ खात कोपऱ्यात

मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली मावळ लोकसभा मतदारसंघात मतदार जनजागृती करण्यात आली. मतदारांना केंद्रापर्यंत नेण्यासाठीदेखील नियोजन करण्यात आले होते. परंतु, करंजासह काही मतदान केंद्रामध्ये वयोवृध्दासह दिव्यांग मतदारांना उचलून मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाण्याची वेळ आली. मतदारांची गैरसोय होऊ नये यासाठी केंद्रामध्ये व्हील चेअर ठेवण्यात आली होती. मात्र त्या केंद्रामध्ये असलेल्या व्हील चेअरचचा वापर करण्यास तेथील प्रशासन उदासीन ठरले. त्यामुळे व्हीलचेअर धुळ खात कोपऱ्यात पडून असल्याची दिसून आली. प्रशासनाच्या या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.

## मतदार भर उन्हात

मावळ लोकसभा मतदारसंघातील मतदान प्रकिया सुरळीत पार पाडण्यसाठी प्रशासन सज्ञ असल्याचा गाजावाजा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केला. निवारा शेडपासून वेगवेगळया सुविधा त्याठिकाणी उपलब्ध केल्या जातील असेही सांगण्यात आले. प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी झाली नसल्याचे चित्र पहावयास मिळाले. बेलपाडासह काही मतदान केंद्रामध्ये निवारा शेड व प्रतीक्षा कक्ष नसल्याने अनेक मतदारांना उन्हात उभे राहवे लागले. कडक उन्हाचे चटके लागत असतानादेखील त्यावर मात करीत भर उन्हात मतदानासाठी स्वयंस्फुर्तीने मतदार रांगेत उभे राहिले. या मतदारांनी मतदान करून मतदानाचा हक्क बजावला.

अर्जदारतर्फे ॲड. डी. एन. पाटील

## जाहीर नोटीस

**मुरुड येथिल मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात**

दि. चौ. अर्ज क्र. ९/२०२४
नि. ७/ड

१) श्रीमती जनाबाई जनार्दन नाईक,
वय ७५ वर्षे, धंदा काहीनाही,
२) श्री चंद्रकांत जनार्दन नाईक,
वय ६० वर्षे, धंदा शेती,
३) श्री अनंत जनार्दन नाईक,
वय ५६ वर्षे, धंदा शेती,
नं. १ ते ३ सर्व रा. उंडरगाव, — अर्जदार
पो. शिघ्रे, ता. मुरुड-जंजिरा,
जि. रायगड ४०२४०१.
४) श्रीमती हिरा जनार्दन नाईक,
लग्नानंतरचे नाव हिरा दामोदर वारगे
वय ५० वर्षे, धंदा शेती,
रा. खारआंबोली, पो. शिघ्रे,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड.
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

सर्व लोकांस कळविण्यांत येते की,

१) अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील कै. जनार्दन विठ्ठल नाईक हे दिनांक ०१/०२/२०१२ रोजी मौजे उंडरगाव,ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे राहत्या घर मयत झाले असून त्यांचे हे दफनविधी व अंत्य संस्कार हे मौजे उंडरगाव येथे करण्यांत आले होते. कै. जनार्दन विठ्ठल नाईक यांत पश्चात त्यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाहीत.

२) अर्जदार नं. १ ते ४ यांस कै. जनार्दन विठ्ठल नाईक यांचे खाजगी कामाकरीता कायदेशिर वारस असल्याबाबतच्या वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

३) कै. जनार्दन विठ्ठल नाईक हे मयत झाले असल्यामुळे अर्जदार नं. १ ते ४ यांस त्यांचे कायदेशिर वारस म्हणून अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळणेकामी अर्जदार यांनी सदर अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे.

तरी या बाबत कोणचीही हरकत असल्यास त्याने सदर हरकत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या में. न्यायालयात समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात दाखल करावी. जर मुदतीत तशी कोणतीही हरकत आली नाही तर सदरचा दाखला अर्जदार यांस देण्यांत येइल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. आज तारीख ०८/०५/२०२४ रोजी माझ्या सही शिक्यानिशी प्रसिद्ध केली.

**सही/-**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**क. लिपीक**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर**
**मुरुड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस याजाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक तसनीम अहमदी व हुजेफा अजिज अहमदी यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| आवास | ५८२ | १-०३-३० | ३४.७७ |
| | | पो. ख. ०-०३-९० | |
| | | १-०७-२० | |

पैकी तसनीम अहमदी व हुजेफा अजिज अहमदी यांच्या मालकीची ० हेक्टर ४१.० आर, आकार १३ रु.४६ पैसे एवढी मिळकत

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कहित संबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : १४/५/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत श्रीमती छाया पंजाब बहुरूपी, राहणार चेंढरे, तालुका अलिबाग, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सातिर्जे, ता. अलिबाग. | २७५/११ | ३-६५-०० एकूण | ३६-५० |

अलिबाग,
दिनांक : १३/०५/२०२४

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की.

मिळकतीचे वर्णन :- मौजे आंबोली, ता. मुरुड, जि. रायगड, गट क्रमांक उपविभाग ५५, एकूण क्षेत्र हे. आर. ०-४०-५०, आकार रु. पैसे. ५-७२, लागवड- भात, एवढ्या क्षेत्राची मिळकत आमच्या अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालक एजाज ताजुद्दीन बांगारे, नवीन ताजुद्दीन बांगारे, असगरी नझिर बांगारे, इस्मत अमानुल्ला घरटकर, सबिहा मुनाफ दांडेकर यांचेकडून रजिस्टर्ड खरेदीखताने कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

ही मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निषेध व बोजाविरहीत आहे असे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून येणाऱ्या हरकती आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

लक्ष्मीखार, मुरुड
ता. मुरुड-जंजिरा,
जि. रायगड, पिन कोड नं. ४०२४०१
दि. १३/०५/२०२४

सही/-
**ॲड. एम. जे. तांबडकर**
बी.कॉम.एल.एल.एम.
ॲडव्होकेट व नोटरी

# रेवदंड्यात हवामान बदलाचा फटका

**रेवदंडा :** मागील काही दिवसांपासून परिसरात हवामान बदलाचा त्रास नागरिकांना होऊ लागला आहे. दुपारनंतर ढगाळ हवामानामुळे काही ठिकाणी अवकाळी पाऊस होत आहे. यामुळे शेतकरीवर्गाचे नुकसान होत आहे. यंदा तालुक्यात हवामानात वेगाने बदल होत आहे. काही ठिकाणी अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. सातत्याने बदलत्या हवामानामुळे शरीराची लाही लाही होत असून नागरिक हैराण झाले आहेत.

**asREC (India) Limited**
बिल्डिंग क्र. २, युनिट क्र. २०१-२०२ ए आणि २००-२०२ बी, तळ मजला, सोलिटेअर कॉर्पोरेट पार्क, अंधेरी घाटकोपर लिंक रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

**शुद्धिपत्रक**

सरफेसी अधिनियम अंतर्गत मे. सी के एंटरप्रायजेस च्या गहाणित मिळकतीच्या संदर्भात फ्री प्रेस जर्नल (इंग्रजी) आणि नवशक्ति (मराठी), मुंबई आवृत्ती आणि कृषीवल (मराठी) रायगड/अलिबाग आवृत्तीमध्ये प्रकाशित ११.०५.२०२४ दिनांकित विक्री सूचनेच्या संदर्भात. याद्वारे सूचित केले जाते की, राखीव किंमत (रू. लाखात) ९२.०० च्या ऐवजी ९८.०० म्हणून अनवधानाने नमूद केले होते आणि ई.एम.डी. (रू. लाखात) ९.२० च्या ऐवजी ९.८० म्हणून अनवधानाने नमूद केले होते. सर्व इतर तपशील, अटी आणि शर्ती अपरिवर्तित राहतील.

**दिनांक :** १४.०५.२०२४
**ठिकाण :** मुंबई

सही/-
प्राधिकृत अधिकारी, एएसआरईसी (इंडिया) लि.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीपैकी ०-१८-०० आर्स जमिन मिळकत श्रीमती इंदिरा नथुराम साळुंखे, श्री. संजय नथुराम साळुंखे, दोघेही राहणार एम-१, कर्मयोग सोसायटी, आझाद नगर, जे.पी.रोड, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३ व श्रीमती सुलभा नथुराम साळुंखे, राहणार जुबली मनोहर बिल्डिंग, दुसरा मजला, फ्लॅट नं. २४, यारा रोड, काळसेकर हॉस्पिटलच्या शेजारी, आणि अंजुमन शाळा, वर्सोवा, मुंबई ४०० ०६१ यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्रीमती इंदिरा नथुराम साळुंखे, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| म्हात्रोळी, ता.अलिबाग. | २०८ | ०-५३-६०<br>०-०३-८० पो.ख.<br>०-५७-४० एकूण | ७-८१ |

सदर जमिन मिळकतीपैकी श्रीमती इंदिरा नथुराम साळुंखे, श्री. संजय नथुराम साळुंखे व श्रीमती सुलभा नथुराम साळुंखे, यांच्या मालकीची ०-१८-०० आर्स जमिन मिळकत.

अलिबाग,
दिनांक : १३/०५/२०२४.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती या त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, बयानापावती, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतींच्या मालकांबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे सापेले, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| मालकांचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ. | रुपये | पैसे |
| १) श्री. गणेश दिलीप देवघरे | ८ | ३ | ००-४०-३० | २ | ५० |
| २) श्री. वैभव चंद्रकांत कडव | ९ | ७ | ००-२१-५० | २ | ९४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- २०३ व २०४, दुसरा मजला, साईधाम अपार्टमेंट, हुतात्मा हिराजी पाटील चौक (अंबिका नाका), पो. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड.

सही/-
**अल्पेश अनंत कराळे**
(ॲडव्होकेट)
दिनांक :- १२/०५/२०२४
मो.नं.९९२२३६८१२१

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. काशिनाथ मोतिराम पाटील, यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांसोबत व्यवहार ठरलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिल प्रमाणे :-

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्रफळ (आर.चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| तुडाळ ता. अलिबाग, जि. रायगड | १२/३ | जिरायत क्षेत्र ०-३३-६०<br>वरकस क्षेत्र ०-१३-२०<br>एकुण ला. यो क्षेत्र ०-४६-८०<br>पो.ख. ०-०५-२०<br>एकूण क्षेत्र ०-५२-०० | ८.५७ |

वर नमुद मिळकतीपैकी ०-१५-०० हे.आर.चौ.मी., या मिळकतीबाबत..

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वर नमुद मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १३/०५/२०२४

सही/-
**ॲड. विनित जितेंद्र वर्तक**
रा. बुरूमखाण, वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं. ७३५००७१६९३/९२८४४२२४११

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे विद्यमान श्री. शैलेश जनार्दन चवळे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे उमरोली, तालुका कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| ११ | २ | ०.०७.०० | ०.१६ |

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकाची निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तदंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकत संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वानी नोंद घ्यावी.

दि. १४/०५/२०२४

खरेदीदारा तर्फे वकील
**ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव**
पत्ता. मार्बल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४.
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे इंद्रपै, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर १३२, क्षेत्र ०-२१-३० हे. आर., पो. ख. ०-०२-४० हे. आर., एकूण क्षेत्र ०-२३-७० हे. आर., आकार ५.८६ रू. पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. गणेश आत्माराम म्हात्रे २) श्री. दिलीप आत्माराम म्हात्रे ३) श्री. प्रदिप आत्माराम म्हात्रे ४) श्री. संजय आत्माराम म्हात्रे ५) श्री. प्रविण आत्माराम म्हात्रे ६) श्रीमती सुशीला आत्माराम म्हात्रे ७) विजया उर्फ विनया विजय राऊत ८) अंकिता अनिल वारीक रा. मु. अंबालाल शॉप समोर, घर नं. ५२९ अ, केगाव, उरण, जि. रायगड, ४००७०२ यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : १३/०५/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो., ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, अर्जदार श्री. कृष्णा तुकाराम खरे रा.नांदगाव, ता. सुधागड यांनी त्यांची आई लक्ष्मीबाई तुकाराम खरे यांचा मृत्यु दि.०८/१२/२०१९ रोजी मौजे-नांदगाव ता.सुधागड येथे झाला आहे. परंतु त्यांची नोंद अद्यापपर्यंत केली नाही असे नमूद करून तहसिल कार्यालय, सुधागड येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

सदरहू लक्ष्मीबाई तुकाराम खैरे यांच्या मृत्युबाबत अगर मृत्युच्या तारखेबाबत कोणाची हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून पंधरा दिवसाच्या आत तहसिल कार्यालय सुधागड पाली येथे स्वतः अथवा आपल्या प्रतिनिधीमार्फत लेखी स्वरूपात हरकती दाखल करावी. जर सदर मुदतीत हरकत न आल्यास अर्जदार यांनी सादर केलेल्या पुराव्याच्या आधारे मृत्यु नोंद करण्याचे आदेश पारीत करणेत येईल, असे या जाहीर नोटीसद्वारे प्रसिद्ध करणेत येत आहे.

सदर नोटीस आज १३/०५/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली आहे.

ठिकाण :- सुधागड पाली
दिनांक :- १३/०१/२०२४

सही/-
**(उत्तम कुंभार)**
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी सुधागड

ॲड.एस.वाय.बारटके
वादीचे वकील

## जाहीर समन्स/नोटीस

**मुरूड येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात**

नि.६६/ड
रेग्युलर दरखास्त क्र. ०२/२०१५

श्री. सुनिल नारायण भगत — वादी
विरूध्द
०१) नथुराम पदया पाटील मयत तर्फे वारस
१/१) श्री. दत्ताराम नथुराम पाटील
१/२) श्रीमती हिरा नितेश राणे
१/३) मच्छिंद्र नथुराम पाटील मयत तर्फे वारस
१/३/१) श्री. अक्षय मच्छिंद पाटील
१/३/२) सौ. निकीता मनोज अरकर
१/४) गंगू गणपत अरकर मयत तर्फे वारस
१/४/१) श्री. गणपत अरकर
१/४/२) श्री. भुपेंद्र गणपत अरकर — प्रतिवादी
१/४/३) श्री.चंदु गणपत अरकर
१/४/४) सौ. योगिता प्रकाश पाटील
१/४/५) सौ. निता प्रविण पाटील
०२) श्रीमती निर्मला महादेव पाटील
०३) श्रीमती जया महादेव पाटील
०४) श्री. मालजी महादेव पाटील
०५) श्री. शंकर गोविंद पाटील
सर्व रा. जमृतखार, पो. सावली
ता. मुरूड,
जि. रायगड

या जाहीर संमन्स/नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, मौजे सावली, ता. मुरुड, जि.रायगड येथील गट नं. २८१ क्षेत्र २.६२.० पैकी ०.८४.० आकार रू. २.२६ पैसे या मिळकती बाबत वादी यांनी या न्यायालयात कराराची विशेष पुर्तता करून मिळणे करीता दावा दाखल केला होता. त्याचा निर्णय वादी याचे लाभात झाला. त्या निर्णयाची अंमलबजावणी होणेकरीता वादी यांनी मा. न्यायालयात सदर दरखास्त दाखल केली आहे. सदर दरखास्तीची नोटीस आपणांस काढली असता आपल दिलेल्या पत्यावर रहात नाही, अशा शेऱ्यासह परत आली आहे. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता हाच आहे, अशी वादी यांस माहिती आहे. सबब, आपणांस या जाहीर समन्स/नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आपण स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, मुरूड यांचे न्यायालयात दिनांक १३.०६.२०२४ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
मुरूड-रायगड

सही/-
**अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
मुरूड-रायगड

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**क्लासिफाईड**
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५

■ फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३.

■ अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इनसेंटीव तसेच अलिबागमधील विविध शाखांसाठी होम रिव्हाईज एज्युकेशन प्रा.लि. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counsellors /sales executive-20, Team managers- 5, Telcaller- 3, संपर्क- ८४१९९४०००४/९३७२०७१७६९

■ 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे महिला व पुरूष सफाई कामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण-इंद्रप्रस्थ, गांवदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क - ८९८०८६१२३४, ८९८०८५१२३४

■ अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०

■ सकाळी घरकामासाठी बाई हवी आहे. ८ ते १० पर्यंत (अलिबाग परिसरातील राहणाऱ्याला प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४

■ Fresh graduates required for office work. For interview call. ९९२३७५०५४९

■ वायशेत येथे मुख्य हमरस्त्यानजीक २ गुंठे प्लॉट वीज, पाणी, वॉलकंपाऊंड, गेट, भराव, शेड व असेसमेंटमधील भाड्याने देणे आहे/विकणे आहे. संपर्क : ७०४५३६६६५२

■ सुरभी स्वयंसेवी संस्था अलिबाग ऑफिस कामासाठी मुले/मुली/महिला पाहिजेत. शिक्षण BA, B.Com, Bsc, msw MBA सिविल हॉस्पिटल अलिबागमध्ये स्वच्छता दूत कामासाठी महिला/पुरूष पाहिजेत. संपर्क : ९४२०६४५५७९/९५२७०४०७५० पत्ता : सुरभी स्वयंसेवी संस्था, कलेक्टर ऑफिस समोर अलिबाग

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे सातिर्जे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाची बिनशेती जमिन मिळकत श्रीमती साधना विलास काटे, राहणार परेल, मुंबई, यांच्या मालकीची असून, सदरील बिनशेती जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर बिनशेती जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| सातिर्जे, ता. अलिबाग. | २७५/१२ | ३-९०-०० एकूण | ३९-०० |

अलिबाग,
दिनांक : १३/०५/२०२४

सही/
**(ॲड. संजय म. भगत )**
हिराबाग सोसायटी,अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मोजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अजय यशपाल गुप्ता यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १७ | ४/अ | ०-९४-०० | १-०६ |
| १७ | ३/ब | ०-०६-०० | ०-०५ |
| १७ | ६ | ०-०७-०० | ०-०३ |
| ३५ | ४ | ०-०३-८० | ०-५३ |
| १३ | ४/अ | ०-५१-०२ | ०-१२ |
| १३ | ६/अ | ०-४७-३३ | ०-१२ |
| १६ | ९ | ०-९७-०० | ०-५३ |
| १६ | ८ | ०-३६-०० | ०-१६ |

तसेच मोजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेल्या जमिन मिळकती आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक अजय यशपाल गुप्ता व गुरुबचन सिंग बामरा यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मौजे कुशिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु. पै |
|---|---|---|---|
| १६ | ६ | ०-७७-०० | ०-२२ |
| १७ | १ | ०-७२-०० | ०-४१ |
| १६ | १० | १-०१-०० | ०-२५ |
| १६ | ४ | १-५२-०० | ०-३७ |
| ३५ | २/अ | ०-६३-०० | ६-४० |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा ) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. १४/०५/२०२४
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत सिविल कोर्टसमोर, कर्जत, रायगड

निवडक

## ‘हार्दिकमध्ये अहंकार’

**मुंबई** : हार्दिक पांड्या त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील सर्वात वाईट काळातून जात आहे. एबी डिविलियर्सने म्हटलं की, हार्दिक कर्णधारपदाची जबाबदारी पार पाडताना त्यात अहंकार दिसतो. मुंबई इंडियन्स संघात अनेक खेळाडूंना हार्दिकचं साहसी वाटणारं नेतृत्व पटत नाहीये. मात्र तरीदेखील हार्दिकने ठरवलं आहे की माझ्या नेतृत्वाची हीच पद्धत असणार आहे. हार्दिक स्वत:ला धोनीसारखा कप्टन कूल दाखवण्याचा प्रयत्न करतो. मात्र प्रत्यक्षात तो तसा नाही.

## दयाल ठरला गेमचेंजर

**नवी दिल्ली** : आयपीएलच्या या हंगामात यश दयाल रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी चमकदार कामगिरी करत आहे. आयपीएल २०२४ पूर्वीच्या मिनी लिलावात यशला बंगळुरूनं ५ कोटी रुपयांना विकत घेतलं होतं. यापूर्वी, तो गुजरात टायटन्सचा भाग होता. आरसीबीमध्ये येताच यशच नशीब पालटलं आहे. यश या हंगामात आरसीबीसाठी प्रमुख वेगवान गोलंदाजांपैकी एक आहे. त्यानं बंगळुरूसाठी १२ सामने खेळले, ज्यामध्ये त्यानं १३ बळी घेतले आहेत.

## कोहली इशांतमध्ये वाद

**चेन्नई:** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने दिल्ली कॅपिटल्सचा ४० धावांनी पराभव केला. कोहलीने इशांतविरुद्ध ६ चेंडूत १९ धावा केल्या. यामध्ये २ षटकार आणि एक चौकाराचा समावेश होता. चौकार मारल्यानंतर विराटने इशांतला चिडवायला सुरुवात केली पण इशांतने चौथ्या षटकात विराटला बाद करत धावसंख्या बरोबरीत आणली. दुसऱ्या डावात ९ विकेट पडल्यानंतर इशांत पुन्हा फलंदाजीला आला. आता विराटची पाळी होती आणि त्याने इशांतलाही त्रास दिला.

## भारतीय संघात वंशभेद?

**केरळ** : भारताच्या २००७ च्या टी २० विश्व-चषक विजेत्या संघातील माजी खेळाडू याचबरोबर २०११ च्या एकदिवसीय विश्वचषक विजेत्या संघात समाविष्ट असलेल्या श्रीसंतने धक्कादायक खुलासा केलो. श्रीसंतने खुलासा केला की, आयुष्यभर मला संघातील खेळाडूंनी मद्रासी म्हणून म्हणत माझी चेष्टा केली. मद्रासी हे तामिनाडूमध्ये राहणाऱ्या लोकांना बोलवलं जातं. मात्र उत्तर भारतातील काही खेळाडू हे मुंबईच्या खालील सर्व लोकांसाठी मद्रासी शब्द प्रयोग वापरायचे.

## पिकलबॉल लीगची घोषणा

मुंबई : भारतात रॅकेट स्पोर्ट्सचा विस्ताव वाढतोय आणि रॅकेट स्पोर्ट्सवर प्रेम करणाऱ्या खेळाडूंसाठी एक आनंदाची बातमी आहे. नाटेकर स्पोर्ट्स अँड गेमिंग आणि सोनी एंटरटेनमेंट टॅलेंट व्हेंचर्स इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पिकलबॉल लीग ही व्यावसायिक पिकलबॉल लीग सुरू करण्यात येत आहे. ही अर्जुन पुरस्कार विजेते गौरव नाटेकर आणि त्यांची पत्नी आरती नाटेकर ज्या टेनिसम धील भारताच्या माजी खेळाडू आहेत, त्यांच्याद्वारे प्रमोट केलेली कंपनी आहे.

## पावसाच्या व्यत्ययावर बीसीसीआयकडून
# आर्टिफीशीअल पीचचा उतारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय क्रिकेटचा कारभार पाहणारी ही संस्था जागतिक क्रिकेटमध्ये आपला दबदबा कायम राखून आहे. आतापर्यंत भारतात क्रिकेटच्या प्रगतीसाठी ने अनेक प्रयोग केले आहेत. आता खेळपट्टीच्या दृष्टीकोनातून ने आणखी एक नवीन प्रयोग केला आहे. क्रिकेटच्या सामन्यामध्ये आतापर्यंत अनेकदा पिच हा मुद्दा कळीचा ठरलेला आपण पाहिला आहे. अगदी मागच्या वर्षी एक दिवसीय विश्वचषकामध्ये अंतिम सामन्याचे पिचही वादाचा विषय ठरला होता. याव्यतिरीक्त अनेकदा पावसामुळे पिच खराब होऊन मॅच रद्द झाल्याच्या घटनाही आपण अनुभवल्या असतील. परंतु यापुढे अशा घटना होणार नाहीत.



हिमाचल प्रदेशच्या धर्मशाला क्रिकेट मैदानात बीसीसीआयने आर्टिफीशीअल पीचचा प्रयोग केला आहे. बीसीसीआयने या प्रयोगाला मंजूरी दिली आहे. नैसर्गिक गवत आणि आर्टिफीशीअल सिंथेटीक गवताचा वापर करुन एका मशिनच्या सहाय्याने हे हायब्रीड पीच तयार करण्यात आलं आहे. देशभरातील इतर मैदानांमध्येही या आर्टीफिशीअल ग्रासचा वापर करण्याच्या तयारीत आहे.

आर्टिफीशीअल सिंथेटीक फायबर आणि नैसर्गिक गवताच्या मिश्रणातून हे पीच तयार होतं. परंतु दिसताना हे पीच नैसर्गिक गवतासारखंच दिसतं. धर्मशाळा येथे तयार करण्यात आलेल्या हायब्रीड पीचमध्ये फक्त ५ टक्के आर्टिफिशीअल फायबर वापरण्यात आलं आहे. मुख्य पीच सोबतच बाजूच्या ३-४ प्रॅक्टीस पीचही याच पद्धतीने तयार करण्यात आल्या आहेत. आर्टिफीशीअल सिंथेटीक फायबरचा वापर कमी प्रमाणात केल्यास मैदानाचं नैसर्गिक सौंदर्य आणि क्षमता कायम राहते.

**नैसर्गिक गवताच्या तुलतेन आर्टिफीशील गवत फायदेशीर -**

हायब्रीड गवताचा वापर केल्यामुळे पीच हे अधिक टिकाऊ बनतं. याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे आर्टिफीशीअल गवत हे लगेच खराब होत नाही. अनेकदा द्विपक्षीय मालिकांमधले सामने हे एकाच ठिकाणी १-२ दिवसांच्या अंतराने खेळवले जातात. अशा परिस्थितीत खेळपट्टी नव्याने तयार करणं हे जिकरीचं काम असतं. परंतु आर्टिफीशीअल ग्रासचा वापर झाल्यास हे पीच चांगल्या परिस्थितीत राहू शकतं.

अनेकदा पावसाचा व्यत्यय आल्यानंतर पीच खराब झाल्याचं आपण पाहिलं आहे. त्याचा परिणाम सामना रद्द होण्यापर्यंत होतो, ज्यामुळे प्रेक्षकांचा हिरमोड होतो. परंतु आर्टिफीशीअल ग्रासचा वापर करुन पीच तयार केल्यास प्रेक्षकांच्या आनंदावर विरजण पडणार नाही. पाऊस पडल्यानंतर १०-१५ मिनीटात पाणी शोषून घेण्याची क्षमता या आर्टिफीशीअल पिचमध्ये असते.

**मैदानावर कसं लावलं जातं आर्टिफीशीअल पिच?**

हायब्रीड पीच मैदानावर बसवण्यासाठी युनिवर्सल मशीन महत्वाची असते. २०१७ साली नावाच्या कंपनीने हे मशीन तयार केलं. कंपनीच्या दाव्यानुसार हायब्रीड पीच तयार करण्याच्या प्रक्रियेत कुठेही काँक्रीटचा वापर होत नाही. आर्टिफिशीअल गवताला मैदानात जमिनीच्या आत लावलं जातं. ज्यामुळे आपल्या डोळ्यांना मैदान हे एकसारखंच दिसतं आणि त्यात फारसा फरक दिसून येत नाही.

आतापर्यंत फुटबॉल, रग्बी यासारख्या खेळांमध्ये आर्टिफीशीअल पिचचा वापर झाला आहे. क्रिकेटचा विचार करायला गेलं तर इंग्लंडमध्ये लॉर्ड्स आणि ओव्हलच्या मैदानावरच या आर्टिफिशीअल पिचचा प्रयोग यशस्वी झाला आहे.

# पीएनपी सीबीएसईचा निकाल १०० टक्के
## ज्वलिता गट्टू ९१.८ टक्के गुण मिळवून संस्थेत प्रथम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्डचा सोमवारी (दि. १३) इयत्ता दहावीचा निकाल अधिकृत वेबसाईटवर जाहीर करण्यात आला.

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या होली चाईल्ड सीबीएसई स्कूल वेश्वीच्या शाळेचा निकाल १०० टक्के लागला आहे. घवघवीत यश संपादन करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.





यामध्ये ज्वलिता गट्टू ९१.८ टक्के (४५९/५००) मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, वंश नागडा ८५.२ टक्के (४२६/५००), द्वितीय क्रमांक पटकावला, तर त्वालीया जुईकर याने ८५ टक्के (४२५/ ५००) मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. इतर उत्तीर्ण झालेले बहुतांशी विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये नेत्रदीपक यश संपादन करून उत्तीर्ण झालेले आहेत.

सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार जयंत पाटील, खजिनदार नृपाल पाटील, कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, मुख्याध्यापिका वेणी वेल्लईम्मल्ल, उपमुख्याध्यापिका सदाफ शहाबाजकर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.

# झिम्बाब्वेने केले बांगलादेशला चीतपट

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

झिम्बाब्वेने अखेरच्या ट्वेंटी-२० सामन्यात बांगलादेशचा पराभव केला. बांगलादेश दौऱ्यावर आलेल्या झिम्बाब्वेने यजमान संघाविरोधात पाच ट्वेंटी-२० सामन्यांची मालिका खेळली. सुरुवातीचे चारही सामने गमावल्यानंतर झिम्बाब्वेसमोर क्लीन स्वीपचा धोका होता. पण, अखेरच्या सामन्यातील विजयाने पाहुण्या संघाने शाकीब अल हसनला चोख प्रत्युत्तर दिले. अखेरच्या सामन्यात झिम्बाब्वेने ८ गडी राखून विजय साकारला.



खरे तर या सामन्यापूर्वी बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू शाकीबने एक मोठे विधान केले होते. त्यामुळे आता झिम्बाब्वेने विजयासह शाकीबला प्रत्युत्तर दिल्याचे दिसते. २ जूनपासून अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये ट्वेंटी-२० विश्वचषकाचा थरार रंगणार आहे.

## कार्लसनवर मात

**। वॉरसॉ । वृत्तसंस्था ।**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने सुपरबेट जलद आणि अतिजलद बुद्धिबळ स्पर्धेत विश्वातील अव्वल बुद्धिबळपटू मॅग्सन कार्लसनवर मात केली. मात्र, या विजयानंतरही तो तिसऱ्या स्थानीच राहिला. कार्लसनच्या पराभवामुळे गुणतालिकेत अग्रस्थानी असलेल्या चीनच्या वे यीची आघाडी आता २.५ गुणांनी वाढली आहे. या स्पर्धेतील अतिजलद प्रकाराच्या नऊ फेऱ्या शिल्लक असून वे यी एकूण २०.५ गुणांसह अग्रस्थानावर आहे. अतिजलद प्रकारात पहिल्याच दिवशी त्याने नऊपैकी सात लढतींत विजय नोंदवले. जलद प्रकारातही तोच विजेता ठरला होता. त्याला रोखणे अन्य बुद्धिबळपटूंना आता अवघड जाणार आहे. ही स्पर्धा ग्रँड चेस टूरचा भाग आहे. कार्लसन आता १८ गुणांसह दुसऱ्या स्थानी आहे. प्रज्ञानंदकडून झालेल्या पराभवामुळे तो अग्रस्थानापासून दूर गेला आहे.

# लिंगायत समाज कबड्डी स्पर्धेत मुंबई स्टार स्ट्रायकर्सची बाजी

**। पाली /गोमाशी । वार्ताहर ।**

वीरशैव नागेश्वर माहेश्वर जंगमआळी गोमाशी आणि साई स्पोर्ट् रायगड वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने प्रथमच कोकण विभागीय मर्यादित भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन ११ मे रोजी करण्यात आले होते.



या स्पर्धेचे उद्घाटन रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष सुरेश खैरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा शिवसेना संपर्क प्रमुख विष्णू पाटील, माजी सुधागड तालुका शिवसेना प्रमुख राजेंद्र राऊत,सरपंच गोमाशी मंगल जाधव, उमेशस्वामी जंगम, गजानन जंगम, ओम नागेश्वर मंडळाचे पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत कोकण विभागातील ८ संघांनी आपला प्रवेश निश्चित केला होता.ही स्पर्धा साखळी पद्धतीने स्पर्धा पार पडली. या स्पर्धेची अंतिम लढत मुंबई स्टार स्ट्रायकर्स विरुद्ध श्री देव सोमेश्वर मठ धामापूर या संघात झाली. या स्पर्धेतील अंतिम विजयी ठरला मुंबई स्टार स्ट्रायकर्स या संघास रोख रक्कम १५ हजार व आकर्षक चषक तर उपविजेता ठरलेल्या धामापूर संघास १० हजार व आकर्षक चषक देण्यात आले. या स्पर्धेतील तृतीय क्रमांक यंग स्टार रोहा तर चतुर्थ क्रमांकावर जुगाई स्पोर्ट्स क्लब साखरपा या संघास समाधान मानावे लागले. या दोन्ही संघास प्रत्येकी ५ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू राज जंगम, उत्कृष्ट चढाई पपन लिंगायत(धामापूर), उत्कृष्ट पक्कड शिवम जंगम, पब्लिक हिरो साहिल लिंगायत (साखरपा) या सर्व खेळाडूंना मंडळाच्या वतीने आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले.

# पाकिस्तानने लाज राखली; आयर्लंडची कडवी झुंज

**। आयर्लंड । वृत्तसंस्था ।**

नवख्या आयर्लंडने पाकिस्तान संघाचा पराभव केल्याने शेजाऱ्यांची क्रिकेट वर्तुळात फजिती झाली. आयर्लंड दौऱ्यावर असलेल्या पाकिस्तानला मालिकेतील पहिल्या सामन्यात पराभव पत्करावा लागला. पण, रविवारी झालेला सामना जिंकून पाकने मालिकेत बरोबरी साधली. त्यामुळे तिसरा सामना निर्णायक असणार आहे.



दुसऱ्या सामन्यात पाहुण्या पाकिस्तानने नाणेफेक जिंकून यजमानांना प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. आपल्या घरच्या मैदानावर तगडी धावसंख्या उभारण्यात आयर्लंडला यश आले. त्यांनी निर्धारित २० षटकांत ७ बाद १९३ धावा केल्या. आयर्लंडने दिलेल्या तगड्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानकडून मोहम्मद रिझवान आणि फखर झमान यांनी स्फोटक खेळी केली. सैय अयुब (६) आणि कर्णधार बाबर आझम (०) स्वस्तात परतल्यानंतर रिझवान-झमानच्या जोडीने मोर्चा सांभाळला. त्यांनी दोघांनी अर्धशतके झळकावून सहज लक्ष्य गाठले.पाकिस्तानने १६.५ षटकांत ३ बाद १९५ धावा करून मोठा विजय साकारला.

बाबरच्या नेतृत्वातील संघाने दुसरा सामना ७ गडी आणि १९ चेंडू राखून आपल्या नावावर केला. फखर झमानने ४० चेंडूत ६ षटकार आणि ६ चौकारांच्या मदतीने सर्वाधिक ७८ धावा केल्या, तर रिझवान ४६ चेंडूत ७५ धावा करून नाबाद परतला.दुसऱ्या सामन्यात सांघिक खेळी करण्यात पाकिस्तानला यश आले. शाहीन शाह आफ्रिदीने सर्वाधिक (३) बळी घेऊन यजमानांना २०० च्या आत रोखले. याशिवाय अब्बास आफ्रिदी (२) आणि मोहम्मद आमिर आणि नसीम शाह यांनी प्रत्येकी १-१ बळी घेतला.

# बाबर आझम ठरला सर्वोत्कृष्ट कर्णधार

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान विरूद्ध आयर्लंडमध्ये सध्या टी-२० मालिका खेळवली जात आहे. कर्णधार बाबर आझमच्या नेतृत्त्वाखाली पाकिस्तानचा संघ खेळत आहे. या मालिकेतील आयर्लंडविरूद्धचा दुसरा सामना जिंकत बाबर आझमने आपल्या नावे मोठ्या विक्रमाची नोंद केली आहे. बनून रेकॉर्ड बुकमध्ये आपले नाव नोंदवले आहे. पाकिस्तान विरुद्ध आयर्लंड दुसरा टी-२० सामना जिंकून त्याने ही कामगिरी केली. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम पुरुषांच्या टी-२० क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक विजय मिळवणारा कर्णधार ठरला आहे.

पाकिस्तानच्या या विजयात मोहम्मद रिझवान आणि फखर जमान यांच्यात १४० धावांची भागीदारी निर्णायक ठरली आणि त्यामुळेच पाकिस्तानने आयर्लंडवर विजय मिळवला. या सामन्यात बाबर आझम गोल्डन डकवर बाद झाला होता.आयर्लंडवरील या विजयासह पाकिस्तान संघाने बाबर आझमच्या नेतृत्त्वाखालील ४५ वा टी-२० सामना जिंकला. युगांडाचा कर्णधार ब्रायन मसाबा या यादीत ४४ टी-२० विजयांसह दुसऱ्या स्थानी आहे. तर इंग्लंडचा कर्णधार इयॉन मॉर्गन आणि अफगाणिस्तानच्या असगर अफगाण बरोबरी साधत ४२ विजयांसह तिसऱ्या स्थानी आहेत. तर भारताचे कर्णधार धोनी आणि रोहित ४१ विजयांसह बरोबरीत आहेत.

# हरियाणाचा संदीप चहर अजिंक्य

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

**कर्जतकरांचे ग्रामदैवत श्री धापया महाराज यांचा उत्सव अक्षयतृतीयेपासून सुरू झाला. त्या निमित्ताने शंभर वर्षांहून अधिक वर्षांची परंपरा असलेला कुस्तीच्या आखाड्यात शेवटची कुस्ती हरियाणाचे संदीप चहर हरियाणा आणि पुण्याचे भरत लोकरे यांच्यात चांगलीच रंगली. चहरने भरत याला चितपट केल्याने तो अजिंक्य ठरला. युवराज भगत याने तीन तर लक्ष मढवी याने चार कुस्त्या चीतपट करीत उपस्थित कुस्ती प्रेमींचे मन जिंकले.**



धापया आखाड्यात सकाळी नऊ वाजल्यापासून स्थानिक स्थानिक कुस्तीगीरांमध्ये कुस्ती होऊन कुस्त्यांना प्रारंभ झाला. कर्जत तालुका कुस्तीगीरी अध्यक्ष भगवान धुळे यांच्या हस्ते उद्घघाटन झाले. याप्रसंगी जेष्ठ पंच मारुती ठाकरे, देवस्थानचे अध्यक्ष गणेश शिंदे, महेंद्र चंदन, मनोज वरसोलिकर, सचिन दगडे, गौरव भानुसघरे, हेमंत पवार, अमित गुप्ता, प्रशांत पाटील, मलेश भोईर आदी उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात ५२ कुस्त्या झाल्या. तर दुपारच्या सत्रात ४२ कुस्त्या झाल्या. आशा एकूण ९४ कुस्त्या झाल्या. सकाळच्या सत्रात विजय ठोंबरे विजेता ठरला. त्याला रोख पारितोषिक देण्यात आले. भगवान धुळे यांनी त्याला गदा देऊन सन्मानित केले.

अंतिम कुस्ती हरियाणाचे संदीप चहर हरियाणा आणि पुण्याचे भरत लोकरे यांच्यात चांगलीच रंगली. चहरने भरत याला चितपट केल्याने तो अजिंक्य ठरला. शेवटच्या कुस्तीसाठी नितीन सावंत यांनी अकरा हजार रुपयांचे पारितोषिक ठेवले होते. मात्र अन्य दानशुरांनी रोख बक्षीसे जाहीर केल्याने या कुस्तीच्या पारितोषिकही रक्कम सोळा हजार रुपयांवर गेली. तसेच भगवान धुळे यांनी आखाडा विजेता चहर याला सुध्दा गदा देवून सन्मानित केले. परभणीच्या अंकुश खांडेकर चित्तथरारक योग प्रात्यक्षिके सादर करून उपस्थिताची दाद मिळविली. दोन्ही सत्रात पंच म्हणून दीपक भुसारी, दत्तात्रय म्हसे, रमेश लोभी, वासुदेव भगत यांनी काम पाहिले.

१०२ वर्षांचे कुस्ती पंच मारुती ठाकरे यांचा तसेच दत्त-त्रेय पालांडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. श्रीराम पाटील यांनी संपूर्ण दिवस सर्वच कुस्त्यांचे समालोचन कुस्तीचा इतिहास सांगत विविध किस्से सांगत उपस्थितांचे आठवणींना उजाळा दिला. दिलीप ठाकरे यांनी सूत्र संचालन केले. या आखाड्यात रोख पारितोषिके देण्यासाठी पपू गुरव, मंगेश देशमुख, अमित गुप्ता, पंकज बडेकर, योगेश देशमुख, सुवर्णा जोशी, महेंद्र चंदन, नितीन गुप्ता, अभिजित मुधोळकर, बंटी गुप्ता आदींनी सहकार्य केले.

माजी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, नितीन सावंत, निलेश घरत, मुकेश पाटील, कैलास गायकवाड, अशोक शिंदे, प्रकाश आणेकर आदींच्य हस्ते जिंकलेल्या कुस्तीगिरांना पारितोषिके देण्यात आली.

यावेळी दिल्ली, हरियाणा, मुंबई, पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, नाशिक, अहमदनगर आदी भागांतून आलेले पहेलवान या कुस्ती स्पर्धेत सहभागी झाले होते. ग्रामीण भागातून असंख्य कुस्तीप्रेमी यावेळी उपस्थित होते.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आँर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)